## प्रकरण पाच

## उपलब्ध माहितीचे संघटन, पृथःकरण, विशदीकरण व निष्कर्षांचे

## सूत्रीकरण

५.१ प्रास्ताविक

५.२ मुख्याध्यापक प्रश्नावलीचे विश्लेषण

५.३ तालुकामास्तर प्रश्नावलीचे विश्लेषण

५.४ केन्द्रप्रमुख प्रश्नावलीचे विश्लेषण

५.५ शिक्षणविस्तार अधिकारी प्रश्नावलीचे विश्लेषण

प्रकरण पाच

# उपलब्ध माहितीचे संघटन, पृथ:करण, विशदीकरण व निष्कर्षाचे सूत्रीकरण

## ५.१] प्रास्ताविक -

संशोधन समस्येच्या संदर्भात पूर्व नियोजित साधनांचा वापर करून जमा केलेल्या माहितीचे संघटन, पृथ:करण व विशदीकरण करून निष्कर्षाचे सूत्रीकरण केले आहे. गोळा केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण केले. वर्गीकरणा-नंतर जी माहिती कोष्टकामध्ये सांख्यिकीय स्वरूपात रूपांतर करणे शक्य होते तिचे कोष्टकात रूपांतर केले.

कोष्टकात लिहिलेल्या माहितीचा अभ्यास करून मुळची वस्तुस्थिती समजून घेवून पृथ:करणामध्ये कोष्टकात दर्शविलेल्या माहितीचे सुलभरित्या स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. वर्गीकृत माहितीचे शेकडेवारी, सरासरी यांच्या सहाय्याने फेरमांडणी करून सुस्पष्ट रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. पृथ:करण केलेल्या माहितीचे टीका कुशलतेने गुणावगुण विवेचन केले आहे. वस्तुनिष्ठ सामग्रीच्या आधारे निर्णायक निष्कर्ष काढून सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न प्रकरण क्रमांक सहा मध्ये केलेला आहे. या प्रकरणामध्ये मुख्याध्यापक, तालुकामास्तर, केन्द्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी यांच्यासंबंधीत असलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

५.२] मुख्याध्यापक प्रश्नावलीचे विश्लेषण

५.३] तालुकामास्तर प्रश्नावलीचे विश्लेषण

५.४] केन्द्रप्रमुख प्रश्नावलीचे विश्लेषण

५.५] शिक्षणविस्तार अधिकारी प्रश्नावलीचे विश्लेषण

## ५.२] मुख्याध्यापक प्रश्नावलीचे विश्लेषण :-

१] जिल्हा परिषद शिक्षण समितीत मुख्याध्यापकांचे प्रतिनिधी असावेत काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक एक ची योजना केली होती. प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१

| जिल्हा परिषद शिक्षण समितीत मुख्याध्यापकांचे प्रतिनिधी असावेत काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८० | ८० % |
| नाही | २० | २० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीमध्ये मुख्याध्यापकांचे प्रतिनिधी असावेत असे मत असलेल्या मुख्याध्यापकांची संख्या जास्त म्हणजे ८० % इतकी आहे व प्रतिनिधीत्व नसावे असे मत असणाऱ्यांची संख्या कमी म्हणजे २० % इतकी आहे. यावरून असे दिसून येते की, जिल्हा परिषद शिक्षण समितीमध्ये मुख्याध्यापकांचे प्रतिनिधी असावेत, म्हणजे मुख्याध्यापकांच्या विविध वैयक्तिक समस्या उदा. बढती, बदली, आर्थिक बाबी, रजा, सवलती इत्यादी विषयीचे प्रश्न प्रतिनिधींच्या सहाय्याने सुटण्यास मदत होईल.

२] शिक्षणाधिकारी आपल्या शाळांना भेटी देतात काय ?

शिक्षणाधिकाऱ्यांच्या शाळांना भेटी या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २ चे आयोजन केले होते. प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.२ मध्ये वर्गीकरण

<u>सारणी क्रमांक ५.२</u>

| शिक्षणाधिकारी शाळांना भेटी देतात काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ६५ | ६५ % |
| नाही | ३५ | ३५ % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, शिक्षणाधिका-यांच्या शाळांना भेटी होतात असे मत असलेल्या प्रतिसादकांची संख्या ६५ % इतकी आहे व भेटी होत नाहीत असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्या ३५ इतकी आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, शिक्षणाधिका-यांच्या भेटी ६५ % शाळांना झालेल्या आहेत व ३५ % शाळांना भेटी झालेल्या नाहीत. तर शिक्षणाधिका-यांना जास्तीत जास्त शाळांना भेटी देता येतील असे नियोजन करणे गरजेचे आहे.

३] असल्यास वर्षात किती भेटी देतात ?

शिक्षणाधिका-यांच्या शाळांना वर्षातून किती भेटी होतात याचे प्रमाण जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ३ चे आयोजन केले होते. प्रस्तुत प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.३ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.३</u>

| प्रश्न | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षणाधिका-यांच्या शाळांना वर्षातून होणा-या भेटी | ३५ | ३७ | १३ | १० | १ | १ | १ | २ | – | – | – | – |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, वर्षातून १ ही भेट नाही

अशा शाळांची संख्या ३५ इतकी आहे. म्हणजेच ३५ % शाळांना वर्षातून भेटी होत नसल्याने शिक्षणाधिका-यांचे मार्गदर्शन मिळू शकत नाही. ३७ शाळांना १ भेट, १३ शाळांना २ भेटी, व १० शाळांना ३ भेटी असे दिसून येते. अपवादात्मक शाळांना ४ ते ७ भेटी झालेल्या आहेत. साधारणपणे वर्षातून किमान एक तरी भेट प्रत्येक शाळेस व्हावयास हवी. वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, भेटीचे प्रमाण कमी आहे ते वाढविण्याचे नियोजन हवे. भेटीचे प्रमाण वाढले तर शिक्षक-वर्गावर एक प्रकारचा दबाव निर्माण होतो. शाळांना वेळोवेळी मार्गदर्शन होते, उणिवा समजून येतात. भेटीच्या निमित्ताने शाळेतील पाठीमागची राहिलेली कामे वेळीच पूर्ण केली जातात. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेची गती वाढण्यास मदत होते.

४] वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.४ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.४

| वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १०० | १०० % |
| नाही | ० | ० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते असे १०० % मुख्याध्यापकांचे मत आहे.

५] आपल्या शाळेस पुरेसा अर्थपुरवठा होतो काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिशादाचे पुढील सारणी क्रमांक ५.५ मध्ये

वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.५

| आपल्या शाळेस पुरेसा अर्थपुरवठा होतो काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १० | १० % |
| नाही | ९० | ९० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शाळेस पुरेसा अर्थपुरवठा होतो असे मत असलेल्या मुख्याध्यापकांची संख्या फक्त १० % इतकी आहे, व अपुरा अर्थपुरवठा होतो अथवा होत नाही असे मत असणाऱ्या मुख्याध्यापकांची संख्या ९० % इतकी आहे. म्हणजेच ९० % शाळांना पुरेसा अर्थपुरवठा होत नाही. प्राथमिक शिक्षणास पुरेसा अर्थपुरवठा आजही शासन करत नाही. उच्च शिक्षणावर जास्त खर्च होतो. पण प्राथमिक शिक्षण हे अत्यंत महत्वाचे असलेने शासनाने प्राथमिक शिक्षणावर जास्त खर्च करावा असे मुख्याध्यापकांचे मत आहे.

६] नसल्यास कोणकोणत्या बाबतीत आर्थिक अडचणी येतात ?

प्रस्तुत प्रश्नातील उपप्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.६

| खर्चाच्या बाबी | | मुख्याध्यापक संख्या | | |
|---|---|---|---|---|
| उपप्रश्न | | अधिक प्रमाणात | अल्प प्रमाणात | अजिबात नाही |
| अ | शैक्षणिक साधने खरेदी | १० | ८० | १० |
| ब | शैक्षणिक उपक्रमांची राबवणूक | ३० | ५० | २० |

सारणी क्रमांक ५.६]-

| उपप्रश्न | खर्चाच्या बाबी | मुख्याध्यापक संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिक प्रमाणात | अल्प प्रमाणात | अजिबात नाही |
| क | शालेय वास्तूची व्यवस्था | ६० | ४० | - |
| ड | संदर्भ ग्रंथाची उपलब्धता | १० | ४० | ५० |
| इ | दैनंदिन साहित्य खर्च | - | १०० | - |
| फ | अन्य | - | - | - |
| ग | अन्य | - | - | - |

अ] वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, शैक्षणिक साधनांची खरेदी अधिक प्रमाणात असे मत असणा-या मुख्याध्यापकांची संख्या १० % इतकी आहे. अल्पप्रमाणात असे मत असणा-या मुख्याध्यापकांची संख्या ८० % व अजिबात नाही असे मत असणा-यांची संख्या १० % इतकी आहे.

ब] शैक्षणिक उपक्रमांची राबवणूक शाळांमधून अल्पप्रमाणात होते असे मत असणा-या मुख्याध्यापकांची संख्या ५० % इतकी आहे, शैक्षणिक उपक्रमांची राबवणूक शाळांमधून अजिबात होत नाही असे २० % मुख्याध्यापकांचे मत आहे. ३० % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शैक्षणिक उपक्रम राबवणूक अधिक प्रमाणात होते असे मत आहे. शैक्षणिक उपक्रमांची राबवणूक समाधानकारकरित्या होत नाही तसेच शैक्षणिक उपक्रम राबविणे शाळा विकासाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

क] शालेय वास्तूची व्यवस्था अधिक प्रमाणात ६० % व अल्पप्रमाणात ४० % व अजिबात नाही असे मत असणा-या प्रतिसादकांचे प्रमाण शून्य आहे. ४० % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शालेय वास्तूची व्यवस्था ४० % ठिकाणी अल्पप्रमाणात होते.

ड] संदर्भ ग्रंथाची उपलब्धता अल्पप्रमाणात आहे असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ४० % इतके, तर अजिबात नाही असे मत असणा-या

मुख्याध्यापकांचे प्रमाण ५० % इतके, अधिक प्रमाणात आहे, असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १० % इतके आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, संदर्भग्रंथांची उपलब्धता अपूरी आहे. ग्रंथ हेच गुरू असलेने, संदर्भग्रंथाचा उपयोग विषयाध्यासाठी, व ज्ञानप्राप्तीसाठी, ज्ञानविकासासाठी होतो त्यामुळे त्याची आवश्यकता आहे.

इ] १००% मुख्याध्यापकांचे मतानुसार दैनंदिन सादिल खर्च अल्प प्रमाणात आहे.

७] जिल्हा परिषदेने पुरविलेल्या बाबींची संख्या व गुणवत्ता योग्य असते काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.७ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.७

| जिल्हा परिषदेने पुरविलेल्या बाबींची संख्या व गुणवत्ता योग्य असते काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५० | ५० % |
| नाही | ५० | ५० % |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, जिल्हा परिषदेने पुरविलेल्या बाबींची संख्या व गुणवत्ता ५० % मुख्याध्यापक योग्य आहे असे म्हणतात. व ५० % मुख्याध्यापक अयोग्य आहे असे म्हणतात. यावरून असे निदर्शनास येते की, पुरविलेल्या बाबींची संख्या व गुणवत्ता असमाधानकारक आहे. पुरविलेल्या बाबींची संख्यात्मक व गुणात्मक वाढ होणे ही काळाची गरज आहे. शैक्षणिक साहित्य, फर्निचर, पुस्तके चांगल्या प्रतिची

असल्याशिवाय जास्त काळ ती टिकत नाहीत. थोड्याशा वापराने खराब झाल्यास नंतर उपलब्ध होईतोपर्यंत शैक्षणिक उपक्रम राबविणे गैरसोयीचे होते. साहीत्य हे दिर्घायुषी, उपयोगी, आकर्षक असणे गरजेचे आहे.

८] शाळेच्या गरजांसाठी कमी पडणारा पैसा कसा जमविता ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.८ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.८

| शाळेच्या गरजांसाठी कमी पडणारा पैसा कसा जमविता ? | देणगी गोळा करुन | शिक्षक वर्गणीतून | मनोरंजन कार्यक्रम घेवून | अन्य |
|---|---|---|---|---|
| | ७३ | १० | १२ | ५ |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ७३ % देणगी गोळा करुन पैसा जमविला जातो. १० % शिक्षक वर्गणीतून पैसा गोळा केला जातो. १२ % मनोरंजन कार्यक्रम घेवून व ५ % अन्य मार्गांनी निधी जमविला जातो. शाळेच्या गरजांसाठी कमी पडणारा पैसा हा देणगी गोळा करुन केला जातो. शिक्षणासाठी देणगी देणा-या व्यक्ती समाजात काही प्रमाणात आहेत.

ब] साधनसुविधा पुरविणे :-

१] आपल्या शाळेस पुरेशी इमारत आहे काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.९ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.९

| आपल्या शाळेस पुरेशी इमारत आहे काय ? | मुख्याध्यापक संख्या | |
|---|---|---|
| होय | ७० | ७० % |
| नाही | ३० | ३० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ७० % शाळांना पुरेशी इमारत आहे व ३० % शाळांना पुरेशी इमारत नाही.

२] इमारत जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१० मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१०

| इमारत जिल्हा परिषद मालकीची आहे काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७० | ७० % |
| नाही | ३० | ३० % |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, शाळांच्या इमारती जिल्हा परिषद मालकीच्या बहुतांशी म्हणजे ७० % इतक्या आहेत. ३० % खोल्या जिल्हापरिषद मालकीच्या नाहीत. अलिकडे जवाहरयोजना, आमदारफंड, खासदार फंड इत्यादीमधून खोल्यांचे बांधकाम झालेले व पुर्ण असलेले दिसून येते.

३] असलेल्या खोल्या सुस्थितीत आहेत काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.११ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.११

| असलेल्या खोल्या सुस्थितीत आहेत काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७० | ७० % |
| नाही | ३० | ३० % |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, ७० % खोल्या सुस्थितीत आहेत, ३० % खोल्या नादुरुस्त व सुस्थितीत नाहीत. इमारत, खोल्या सुस्थितीत असणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा पावसाळ्यामध्ये शैक्षणिक साहित्याचे फारच नुकसान होते. वादळामुळे छप्पर निघण्याचा धोका असतो. भिंती सुस्थितीत नसल्यास त्या पडण्याची शक्यता असते.

४] इमारतीच्या स्थितीबाबत जिल्हापरिषद समितीस कळविले आहे काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१२ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१२

| इमारतीच्या स्थितीबाबत जिल्हा परिषद समितीस कळविले आहे काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १०० | १०० % |
| नाही | ० | ० % |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, १०० % मुख्याध्यापकांनी इमारतीच्या स्थितीबाबत जिल्हा परिषद समितीस कळविले आहे.

५] असल्यास त्याबाबत कोणते उपाय योजलेत ? [ ✓ ] अशी खूण करा.

हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ५ ची योजना केली होती. प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१३ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१३

| उपाय | ✓ अशी खूण केलेल्या मुख्याध्यापकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अ] पर्यायी इमारत शोधली आहे | २० | २० % |
| ब] इमारतीचा शोध सुरू आहे | १० | १० % |
| क] नविन बांधकाम सुरू आहे | ५० | ५० % |
| ड] बांधकाम करण्याचे ठरले आहे | १० | १० % |
| इ] अन्य | १० | १० % |

६] तुमच्या शाळेत कोणत्या बाबी असाव्यात असे तुम्हाला वाटते ? [ ✓ ] अशी खूण करा.

प्रस्तुत प्रश्नास मुख्याध्यापकांनी खालील बाबीबाबत प्रतिसाद खालील सारणी क्रमांक ५.१४ मध्ये दिला आहे. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे.

सारणी क्रमांक ५.१४

| विविध बाबी | मुख्याध्यापकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अ] सुसज्ज इमारत | १०० | १००% |
| ब] सुसज्य ग्रंथालय | १०० | १००% |
| क] सुसज्य प्रयोगशाळा | १०० | १००% |

सारणी क्रमांक ५.१४]-

| विविध बाबी | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ड] विस्तृत क्रीडांगण | १०० | १०० % |
| इ] बागबगीचा | १०० | १०० % |
| फ] अन्य | - | - |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, सर्वच मुख्याध्यापकांना आपल्या शाळेत सुसज्ज इमारत, सुसज्ज ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, विस्तृत क्रीडांगण बागबगीचा इत्यादी बाबी असाव्यात असे वाटते.

७] तुमच्या शाळेत पुरेसे शिक्षक आहेत काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१५ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.१५</u>

| तुमच्या शाळेत पुरेसे शिक्षक आहेत काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८० | ८० % |
| नाही | २० | २० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ८० % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शाळेत पुरेसा शिक्षकवर्ग असून २० % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शाळेत शिक्षकवर्ग अपुरा आहे. शिक्षकसंख्या वेळोवेळी पूर्ण करणे, याशिवाय रजाकाळात हंगामी शिक्षकपदे भरण्याची व्यवस्था असावी.

८] नसल्यास नियमानुसार अद्याप किती शिक्षकांची गरज आहे ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.१६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१६

| नसल्यास नियमानुसार अद्याप किती शिक्षकांची गरज आहे ? | आवश्यक शिक्षकांचे शेकडा प्रमाण | उपलब्ध शिक्षकांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| | २० % | २० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, शाळांमधुन २०% शिक्षकांची गरज आहे. उपलब्ध शिक्षकांचे नियमानुसार प्रमाण पाहिले तर ८० % इतकेच दिसुन येते.

९] पुरेसा शिक्षकवर्ग का दिला जात नसावा ? [✓] अशी खूण करा.

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१७ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.१७

| पुरेसा शिक्षकवर्ग का दिला जात नसावा ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| विविध बाबी - | | |
| अ] आर्थिक अडचणी | ५० | ५०% |
| ब] चुकीचे धोरण | १० | १०% |
| क] काळकादू धोरण | २० | २०% |
| ड] अनास्था | १० | १०% |
| इ] अन्य | १० | १०% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, आर्थिक अडचणी असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ५०% इतके आहे. चुकीचे धोरण असे मत

असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १०% इतके, कालकादू धोरण असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे मत २०% व अनास्था असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे मत १०% व अन्य मते असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १०% इतके आहे.

१०] जिल्हा परिषदेच्या शिक्षक बदली धोरणाबाबत तुमचे मत काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.१८ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.१८</u>

| जिल्हा परिषदेच्या शिक्षक बदली धोरणाबाबत मत | मुख्याध्यापक संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| पर्याय बाबी - | | | | |
| अ] धोरण योग्य आहे | ७५ | २५ | ७५% | २५% |
| ब] शैक्षणिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. | १० | ९० | १०% | ९०% |
| क] अन्यायकारक आहे | १० | ९० | १०% | ९०% |
| ड] संधीसाधुपणाचे आहे | १० | ९० | १०% | ९०% |
| इ] अन्य | - | - | - | - |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जिल्हा परिषदेचे शिक्षक बदली धोरण योग्य आहे, असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७५% इतके आहे. बदली धोरणाबाबत शैक्षणिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १० % आहे. धोरण अन्यायकारक व संधीसाधुपणाचे आहे असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण अनुक्रमे १०%, १०% इतके आहे. यावरून असे निदर्शनास येते की, अपवादात्मक स्थितीत बदली धोरणाच्या बाबतीत मुख्याध्यापकांचा विरोध दिसून येतो. अन्यथा बदली धोरण योग्यच आहे असे म्हणावे लागेल.

बदल्या या विविध प्रकारच्या आहेत. पती-पत्नी एकत्रिकरण कमीजास्त शिक्षक संख्या, बढतीमुळे होणा-या बदल्या, तालुका बदली, जिल्हा बदली, सोयीसाठी बदली, खास अडचणीनिमित्त बदली इत्यादी.

११] जिल्हा परिषद समितीने राबविलेल्या सेवांतर्गत प्रशिक्षण वर्गाबाबत तुम्हाला काय वाटते ?

प्रस्तुत प्रश्नास मुख्याध्यापकांनी खालील बाबीबाबत प्रतिसाद दिला आहे. त्याचे वर्गीकरण सारणी ५.१९ मध्ये दिले आहे.

सारणी क्रमांक ५. १९

| जिल्हा परिषद समितीने राबविलेल्या सेवांतर्गत प्रशिक्षण वर्गाबाबत तुम्हास काय वाटते ? | मुख्याध्यापक संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| प्रशिक्षण वर्गाबाबतची विविध मते- | | | | |
| अ] प्रशिक्षण वर्ग उपयुक्त होते | ९० | १० | ९०% | १०% |
| ब] कालावधी पुरेसा हवा | ८० | २० | ८०% | २०% |
| क] वर्गास तज्ञ मार्गदर्शक हवेत | १०० | - | १००% | - |
| ड] वर्ग सक्तीचे नसावेत | ८० | २० | ८०% | २०% |
| इ] वर्गानंतर शिक्षणकार्यात पडणारा फरक अजमावावा. | ९० | १० | ९०% | १०% |
| फ] अन्य | - | - | - | - |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ९०% मुख्याध्यापक प्रशिक्षण वर्ग उपयुक्त होते असे मत दर्शवितात. ८०% मुख्याध्यापकांच्या मते प्रशिक्षण वर्गास पुरेसा कालावधी हवा. प्रशिक्षण वर्गास तज्ञ मार्गदर्शक हवेत असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १००% इतके आहे. वर्ग सक्तीचे असावेत असे मत प्रदर्शित करणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण

८०% इतके आहे. वर्गानंतर शिक्षण कार्यात पडणारा फरक अजमावावा असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ९०% इतके आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, वर्गास तज्ञ मार्गदर्शक हवेत. प्रशिक्षण वर्गाचा कालावधी पुरेसा हवा. वर्गानंतर शिक्षण कार्यात पडणारा फरक अजमावावा.

१२] जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या सावित्रीबाई फुले दत्तक-पालक योजनेच्या अंमलबजावणीबाबत तुम्हाला काय वाटते ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२० मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.२०</u>

| जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेच्या अंमलबजावणीबाबत तुम्हाला काय वाटते ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| योग्य | १० | १० % |
| अयोग्य | ९० | ९० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सावित्रीबाई फुले दत्तक-पालक योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे धोरण अयोग्य आहे असे मत समजणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ९०% इतके आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, जिल्हापरिषदेमार्फत राबविण्यात येणा-या सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेची अंमलबजावणी अयोग्य आहे.

१३] जिल्हा परिषद समितीमार्फत राबविण्यात येणा-या शिक्षक बढती धोरणाबाबत आपणांस काय वाटते ? [✓] अशी खूण करा.

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२१ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.२१

| जिल्हा परिषद समितीमार्फत राबविण्यात येणा-या शिक्षक बढती धोरणाबाबत आपणास काय वाटते ? | शेकडा प्रमाण |
|---|---|
| अ] धोरण योग्य आहे | १० % |
| ब] धोरण अन्यायकाकरक आहे | ५० % |
| क] धोरण बदलणे आवश्यक | ३० % |
| ड] अन्य | १० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जिल्हा परिषदेचे शिक्षक बढती धोरण हे अन्यायकारक असून ते बदलणे अत्यंत गरजेचे आहे. धोरण योग्य आहे असे मत असणा-या मुख्याध्यापकांची संख्या फक्त १०% इतकीच आहे.

क] पर्यवेक्षण नियंत्रण -

१] शिक्षण अधिका-यांकडून शाळांचे पर्यवेक्षण व्यवस्थित होते काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२२ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५. २२</u>

| शिक्षणाधिका-यांकडून शाळांचे पर्यवेक्षण व्यवस्थित होते काय ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ६० | ६० % |
| नाही | ४० | ४० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ६०% शाळांचे पर्यवेक्षण व्यवस्थित होते. ४०% शाळांचे पर्यवेक्षण व्यवस्थित होत नाही. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ४० % शाळांचे पर्यवेक्षण व्यवस्थित होणे गरजेचे आहे. त्यासाठी उपाययोजना हवी.

२] नसल्यास त्यात कोणते बदल व्हावेत ?

प्रस्तुत प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी काही उपाय सूचविले आहेत. त्यांना दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२३ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.२३</u>

| नसल्यास त्यात कोणते बदल व्हावेत ? | मुख्याध्यापक संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| <u>पर्याय</u> - | | | | |
| अ] पर्यवेक्षणासाठी सक्षम अधिकारी नेमणे. | ५० | ५० | ५०% | ५०% |
| ब] पर्यवेक्षण कार्यास मुख्याध्यापकांना पुरेसा वेळ मिळावा | ९० | १० | ९०% | १०% |
| क] हे काम अधिक दर्जेदार व्हावे | १०० | - | १००% | - |

सारणी क्रमांक ५.२३ वरून असे निदर्शनास येते की, पर्यवेक्षणासाठी सक्षम अधिकारी नेमावा असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ५० % इतके आहे. पर्यवेक्षणासाठी मुख्याध्यापकांना पुरेसा वेळ असावा असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ९० % आहे व पर्यवेक्षणाचे काम अधिक दर्जेदार व्हावे असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १०० % इतके आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पर्यवेक्षण कार्यास मुख्याध्यापकांना पुरेसा वेळ मिळावा आणि पर्यवेक्षणाचे काम अधिक दर्जेदार होणे गरजेचे आहे.

३] शाळा तपासणीचे काम समाधानकारक होते काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२४ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.२४

| प्रश्न | मुख्याध्यापक संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| शाळा तपासणीचे काम समाधानकारक होते काय ? | ५५ | ४५ | ५५ % | ४५ % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ४५ % शाळांची व्यवस्थित तपासणी होत नाही व ५५ % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शाळांची समाधानकारक तपासणी होत नाही.

४] नसल्यास त्यात कोणत्या बाबी समाविष्ट व्हाव्यात ?

शाळा तपासणीचे कार्य समाधानकारक होत नसल्यास ते समाधानकारक होणेसाठी कोणत्या बाबी समाविष्ट कराव्यात हे जाणून घेणेसाठीच्या प्रस्तुत प्रश्नास मुख्याध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढील सारणी क्रमांक ५.२५ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.२५

| नसल्यास त्यात कोणत्या बाबी समाविष्ट व्हाव्यात ? | मुख्याध्यापक संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| पर्याय - | | | | |
| अ] अध्यापनाचे योग्य मूल्यमापन | ६५ | ३५ | ६५ % | ३५% |
| ब] शालेय उपक्रमांची योग्य पाहणी | ६५ | ३५ | ६५ % | ३५% |
| क] शिक्षक शाळा अडचणींची चर्चा | ६० | ४० | ६० % | ४०% |
| ड] शिक्षकांना अध्यापन विषयक मार्गदर्शन. | १०० | - | १०० % | - |
| इ] शाळा तपासणी अधिक वेळा व्हावी | ५० | ५० | ५० % | ५०% |
| फ] अन्य | - | - | - | - |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ६५% मुख्याध्यापकांच्या मतानुसार अध्यापनाचे योग्य मूल्यमापन व्हावे. ६०% प्रतिसादकांच्या मतानुसार शिक्षक शाळा अडचणींची चर्चा व्हावी. १००% मुख्याध्यापकांच्या मतानुसार शिक्षक, शाळा अडचणींची चर्चा व्हावी. १००% मुख्याध्यापकांच्या मतानुसार अध्यापनविषयक मार्गदर्शन व्हावे. ५०% मुख्याध्यापकांचे मत असे आहे की, शाळांची तपासणी अधिक वेळा व्हावी.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, शाळा तपासणीचे कार्य समाधानकारक होण्यासाठी अध्यापनाचे योग्य मूल्यमापन , शालेय उपक्रमांची पाहणी, शिक्षक शाळा अडचणींची चर्चा, शिक्षकांना अध्यापनविषयक मार्गदर्शन व्हावे, म्हणजे शाळेचा गुणात्मक दर्जा वाढेल.

५] पर्यवेक्षणाचे काम करतांना आपणास कोणत्या अडचणी येतात ?

प्रस्तुत प्रश्नावलीखाली कांही उपप्रश्नांचे आयोजन केले आहे. त्या प्रश्नातील संभाव्य अडचणींशी दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.२६

| पर्यवेक्षणाचे काम करताना आपणांस कोणत्या अडचणी येतात ? विविध बाबी | होय | नाही | होय मत असणा-या मुख्याध्यापकांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ] पर्यवेक्षक अहवालास योग्य किंमत दिली जात नाही. | ८० | २० | ८० % |
| ब] शिक्षकांची कामाची प्रवृत्ती कमी होत आहे. | ७८ | २२ | ७८ % |
| क] पात्र शिक्षकांची संख्या कमी होत आहे. | १० | ९० | १० % |
| ड] अनुभव वाढेल तसा शिक्षक शिथिल होत आहे. | २० | ८० | २० % |
| इ] वशिल्याचा प्रभाव वाढतो आहे | ७५ | २५ | ७५ % |
| फ] पर्यवेक्षण कार्यास वेळ मिळत नाही | ७८ | २२ | ७८ % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, पर्यवेक्षण अहवालास योग्य किंमत दिली जात नाही असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ८० % इतके आहे. शिक्षकांची कामाची प्रवृत्ती कमी होत आहे असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७८ % इतके आहे. वशिल्याचा प्रभाव वाढतो आहे असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७५ % इतके आहे. पर्यवेक्षण कार्यास पुरेसा वेळ मिळत नाही असे मत असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७८ % इतके आहे. यावरून असे दिसून येते की, पर्यवेक्षण अहवालास योग्य किंमत द्यावी.

शिक्षकांनी कामाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावा. भ्रष्टाचारी प्रवृत्तीस आळा घालावा. पर्यवेक्षण कार्यास अधिक वेळ मिळावा. भ्रष्टाचारी प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी नैतिक शिक्षणाची गरज आहे.

ड] सर्वसामान्य बाबी -

१] कार्यालयीन कामामध्ये मुख्याध्यापकांचे दररोज सरासरी किती तास जातात ? या प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.२७ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.२७

| कार्यालयीन कामासाठी लागणारा दररोजचा सरासरी वेळ | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ५ तासापेक्षा कमी [शालेय तास] | १५ | १५ % |
| ५ तासापेक्षा जास्त [शालेय तास] | ८५ | ८५ % |

सारणी क्रमांक ५.२७ वरून दिसून येते की, ८५ % प्रतिसादकांच्या मतानुसार कार्यालयीन कामासाठी मुख्याध्यापकांचा वेळ ५ शालेय तासापेक्षा जास्त खर्च होतो.

२] तुमच्या दृष्टीने गेल्या पाच वर्षात जिल्हा परिषदेने कोणते चांगले निर्णय घेतले आहेत ?

७५ % मुख्याध्यापकांच्या मतानुसार -

१] इमारत बांधकाम

२] शिक्षक बदली धोरणाबाबत चांगले निर्णय घेतले आहेत.

३] शिक्षण समितीच्या कामकाजामध्ये अद्यापही कोणते बदल व्हावेत ?

अ] ८० % मुख्याध्यापकांचे असे मत आहे की, सादील खर्च करण्यासाठी

मुख्याध्यापक व शिक्षक यांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावे.

ब] १०० % मुख्याध्यापकांच्या मतानुसार शिक्षण प्रक्रियेत राजकीय प्रतिनिधींचा दबाव येतो, त्यामुळे विकासामध्ये अडथळा निर्माण होतो.

४] सक्तिच्या शिक्षण योजनेच्या कार्यवाहीसाठी परिसरातील विद्यार्थ्यांची नोंद कोण घेते ? योग्य पर्यायावर [✓] खूण करा. या प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.२८ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.२८

| सक्तिच्या शिक्षण योजनेच्या कार्यवाहीसाठी परिसरातील विद्यार्थ्यांची नोंद कोण घेते ? | मुख्याध्यापक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अ] मुख्याध्यापक | ५ | ५ % |
| ब] शिक्षक | ९५ | ९५ % |
| क] शिक्षणाधिकारी | - | ० % |
| ड] जिल्हा परिषद सदस्य | - | ० % |
| इ] शिक्षण समिती सभापती | - | ० % |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, सक्तिच्या शिक्षण योजनेच्या कार्यवाहीसाठी परिसरातील विद्यार्थ्यांची नोंद शिक्षक व मुख्याध्यापक घेतात.

५] शाळेत पाल्य न पाठविणाऱ्या पालकांना नोटीस पाठविता काय ? अशा पालकांच्या घरी भेटी देता काय ?

प्रस्तुत प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.२९ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.२९

| प्रश्न | होय | नाही | होय मत असणाऱ्या मुख्याध्यापकांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| ५] शाळेत पाल्य न पाठविणाऱ्या पालकांना नोटीस पाठविता काय ? | १० | ९० | १० % |
| ६] अशा पालकांच्या घरी भेटी देता काय ? | १०० | – | १०० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शाळेत पाल्य न पाठविणाऱ्या पालकांना नोटीस पाठविण्याचे धाडस मुख्याध्यापक करीत नाहीत. अशा पालकांच्या घरी मात्र १०० % शिक्षक भेटी देतात.

यावरून असे दिसून येते की शाळेत पाल्य न पाठविणाऱ्या पालकांना नोटीसा पाठविण्याचे धाडस मुख्याध्यापकांत निर्माण केले पाहिजे व तसे त्यांना संरक्षणही दिले पाहीजे.

६] सक्तिच्या शिक्षण योजनेच्या प्रभावी कार्यवाहीसाठी काय करावे असे तुम्हास वाटते ? प्रस्तुत प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.३० मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३०

| सक्तिच्या शिक्षण योजनेच्या प्रभावी कार्यवाहीसाठी काय करावे असे तुम्हास वाटते ? | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|
| अ] नोंदी अद्ययावत ठेवाव्यात | १०० % |
| ब] कायदेशीर कार्यवाही करावी | १०० % |
| क] पूर्वप्राथमिक स्तरापासून याची कार्यवाही करावी | १०० % |
| ड] पालकांना प्रेरणेची आवश्यकता आहे. | १०० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, सर्व बाबींशी मुख्याध्यापक सहमत आहेत. याशिवाय मोफत गणवेश, भोजन [दुपारचे], व दैनिक भत्ता देण्यात यावा म्हणजे प्रभावी कार्यवाही होईल असे मुख्याध्यापकांचे मत आहे.

८] तुमच्या शाळेच्या दर्जात भर पडावी म्हणून भावी काळात कोणते उपक्रम राबविण्याचा तुमचा मनोदय आहे ? प्रस्तुत प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादावरून खालील उपक्रम सुचवलेले आहेत.

अ] प्रशस्त क्रीडांगणे, व्यायामशाळा, वाचनालये निर्मिती

ब] वसतिगृहे, विषयशाळा

क] शिष्यवृत्ती, परीक्षेसाठी खास मार्गदर्शन व वर्गाचे नियोजन

ड] शाळासमुह योजना

इ] तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विषयनिहाय वेळोवेळी प्रशिक्षण

फ] शिबीरे, संमेलने, चर्चासत्रे, प्रदर्शने आयोजन

ग] शालेय स्वराज्य, सहकार तत्वावर दुकान व चहा केन्द्र

ह] सहली.

९] याशिवाय अन्य बाबींच्या सूचना -

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादानुसार खालील अन्य बाबी सूचविल्या आहेत.

अ] मुख्याध्यापकांच्या नेमणूका कायमस्वरूपी असाव्यात

ब] मुख्याध्यापक पदवीधर प्रशिक्षित असावेत

क] मुख्याध्यापकांना माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांप्रमाणे शाळेत सर्व अधिकार मिळावेत.

ड] मुख्याध्यापकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत

इ] मुख्याध्यापक पदावर रूजू होण्यापूर्वी पदासाठी प्रशिक्षण द्यावे

फ] मुख्याध्यापक नियुक्ती सोयीच्या [शक्यतो] ठिकाणी करावी. इ.

## ५.३] * तालुका मास्तर प्रश्नावलीचे विश्लेषण *

प्रश्न-१] तालुका मास्तर हे पद मुख्याध्यापक यांना नेमुन दिलेल्या कर्तव्याशिवाय स्वतंत्र असावे असे आपणास वाटते काय ? [होय/नाही]

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.३१ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.३१

| तालुका मास्तर हे पद मुख्याध्यापक यांना नेमुन दिलेल्या कर्तव्याशिवाय स्वतंत्र असावे असे आपणास वाटते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८ | ८० % |
| नाही | २ | २० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, तालुका मास्तर हे पद मुख्याध्यापकांना नेमून दिलेल्या कर्तव्याशिवाय स्वतंत्र असावे असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ८० % इतकी आहे व हे पद स्वतंत्र नसावे असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या २० % इतकी आहे. तालुका शाळेमध्ये काम करणा-या मुख्याध्यापकांना शाळेचे दैनंदिन काम व पर्यवेक्षण करावे लागते. व दैनंदिन काम करीत असताना व करवून घेताना मुख्याध्यापकांवर कामाचा फारच बोजा पडतो. याशिवाय तालुका मास्तरचे काम करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे तालुकामास्तरांना आर्थिक, मानसिक बाबतीत ताण पडतो. शिवाय जादा कामाचा मोबदलाही मिळत नाही. तालुका मास्तरचे काम करीत असताना शाळा अध्यापन व पर्यवेक्षणाकडे साहजीकच दुर्लक्ष होते. त्यामुळे शाळेच्या शैक्षणिक दर्जावर त्याचा विपरीत परिणाम होतो. याकरिता तालुका

मास्तर हे पद मुख्याध्यापकांना नेमून दिलेल्या कर्तव्याशिवाय स्वतंत्र असावे.

प्रश्न-२] पगार विभागामधील आर्थिक व्यवहार करण्यामध्ये आपणास अडचणी येतात काय ? असल्यास कोणत्या ? [होय/नाही]

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३२ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३२

| पगार विभागामधील आर्थिक व्यवहार करण्यामध्ये आपणास अडचणी येतात काय ? असल्यास कोणत्या ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३ | ३० % |
| नाही | ७ | ७० % |

अडचणी -

१] सैनिकांच्या मुलांना मिळणारी शासकीय रक्कम वेळेत मिळत नाही, त्यामुळे पालकांच्या, शाळांच्या तक्रारी येतात.

२] विद्यार्थी उपस्थिती भत्ता वेळेवर मिळत नाही.

३] शिक्षकांची फरकबीले, वेतनवाढी आकारणी, रजा, शिक्षा इत्यादी कारणामुळे पगाराची खोकी लवकर तयार होत नाहीत.

४] पगारपत्रके व पेडपत्रके वेळेवर परत मिळत नाहीत, त्यामुळे आर्थिक व्यवहार करण्यामध्ये अडचणी येतात.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ३० % तालुका मास्तरांचे असे मत आहे की, आर्थिक व्यवहार करण्याच्या संदर्भात वर उल्लेखलेल्या

चार अडचणी निर्माण होतात.

७०% तालुकामास्तरांच्या मते अडचणी आलेल्या नाहीत, असे निदर्शनास येते.

प्रश्न-३] वरिष्ठांकडून आलेले आदेश , परिपत्रके व साहित्य भागातील शाळांना वेळेवर पाठविता काय ? [होय/नाही] नसल्यास कोणत्या अडचणी येतात ? [सविस्तर लिहा]

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३३ मध्ये केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.३३</u>

| वरिष्ठाकडून आलेले आदेश, परिपत्रके व साहित्य भागातील शाळांना वेळेवर पाठविता काय ? नसल्यास कोणत्या अडचणी येतात ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५ | ५० % |
| नाही | ५ | ५० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, वरिष्ठांकडून आलेले आदेश, परिपत्रके व साहित्य भागातील शाळांना वेळेवर पाठवितो असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ५० % आहे. व वेळेवर पाठवू शकत नाही असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ५० % इतकी आहे.

तालुका शाळेमधील कामाचा व्याप हा इतर शाळांपेक्षा जास्त आहे. विभागामधील अनेक शाळा वाडी, वस्तीवर रानात आहेत. त्या ठिकाणी जाण्यालाही वाहतुकीची व्यवस्था असतेच असे नाही. याशिवाय आदेश परिपत्रके घेवून शिक्षकांना पाठविले जाते. ज्या विद्यार्थ्यांना

पाठविले जाते अशा पालकांच्या तक्रारी शाळांच्याकडे येतात.

शिक्षकांना पाठविल्यामुळे दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होवून शिक्षणाचा दर्जा खालावतो. इतर शाळांकडे जाण्यासाठी काही वेळा स्वत:ची वाहने वापरावी लागतात. त्यामुळे आर्थिक हानी होते. शासनाकडून पंचायत समिती शिक्षणविभागाकडून वेळोवेळी विविध प्रकारची माहिती मागविली जाते. ती माहिती विभागामधील शाळांचे गोळा करून पाठवावी लागते. ही कामे माध्यमिक शाळांमध्ये शिपाई व क्लार्क करतात. आज माध्यमिक शाळामध्ये तीन वर्गासाठी ४ शिपाई व १ क्लार्क शासन मान्य करते. पण प्राथमिक स्तरावर अशी कोणतीही उपाययोजना शासन करत नाही, अशी उपाययोजना व्हावी.

प्रश्न-४] आर्थिक व्यवहाराच्याबाबत आपली फसवणूक झाली आहे काय ? [होय/नाही]

प्रस्तुत प्रश्नास तालुकामास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३४ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३४

| आर्थिक व्यवहाराच्याबाबत आपली फसवणूक झाली आहे काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २ | २० % |
| नाही | ८ | ८० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत फसवणूक झालेल्या तालुका मास्तरांची संख्या २० % आहे. ८० % तालुका मास्तरांचे मत आर्थिक व्यवहाराच्याबाबत फसवणूक झाली नाही असे आहे, तालुका मास्तर म्हणून काम करीत असताना शाळांच्या पगारांचे

चेक देणे, गोळा केलेल्या अल्पबचतीच्या रकमा पोष्टामध्ये भरणे , याशिवाय इमारती भाडे, प्रकरणी किंवा वेतनातील त्रुटी, फरक इत्यादी व्यवहार हे सहका-यांच्यावर विश्वास ठेवून करावे लागतात. वेतनातील फरक इमारत भाडे प्रकरणातील पैसे काही वेळा शाळांना तालुकामास्तरांकडे भरणा करावे लागतात. संबंधीत सहका-यांकडे दिले तर काही वेळा ते भरणा केले जात नाहीत. या बाबी ऑडिट मध्ये सापडतात. तालुका मास्तरांना समज मिळते त्यावेळी तालुका मास्तर अडचणीत येतात. काही वेळा तालुका शाळेतजमा असलेले काही पैसे सामुदायिकरित्या शालेय कामालाही खर्च होतात. पण नंतर त्या रकमेची तरतूद असत नाही. त्यामुळे त्यांची फसवणूक होण्याची शक्यता असते.

यासाठी शिक्षकाचे पगार हे बँकेमार्फत व्हावेत. तशी प्रत्येक शिक्षकांची स्वतंत्र खाती असावी म्हणजे आर्थिक व्यवहारात फसवणूक होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

प्रश्न-५] नेमून दिलेल्या शाळेच्या शिक्षणास पूर्ण जबाबदार राहून तालुकामास्तर म्हणून करावे लागणारे काम जास्त आहे असे वाटते का ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३५ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३५

| नेमून दिलेल्या शाळेच्या शिक्षणास पूर्ण जबाबदार राहून तालुका मास्तर म्हणून करावे लागणारे काम जास्त आहे असे वाटते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १० | १०० % |
| नाही | ० | - |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, नेमून दिलेल्या शाळेच्या शिक्षणास पूर्ण जबाबदार राहून तालुका मास्तर म्हणून करावे लागणारे काम जास्त आहे असे मत असणाऱ्या तालुकामास्तरांची संख्या १०० % इतकी आहे.

प्रश्न-६] जादा कामाचा मोबदला मिळतो काय ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या तालुका मास्तरांच्या मतांच्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३६ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३६

| जादा कामाचा मोबदला मिळतो काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | - | - |
| नाही | १० | १०० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, तालुका मास्तर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना नेमून दिलेल्या कामाशिवाय जादा काम करावे लागते मात्र जादा कामाचा मोबदला मिळत नाही. असे मत १०० % तालुका मास्तरांचे आहे.

प्रश्न-७] तालुका मास्तर म्हणून काम करीत असताना होणारा खर्च शासनमान्य करते काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३७ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३७

| तालुका मास्तर म्हणून काम करीत असताना होणारा खर्च शासन मान्य करते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | - | - |
| नाही | १० | १०० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, तालुका मास्तर म्हणून काम करीत असताना होणारा खर्च शासन मान्य करीत नाही असे मत १०० % तालुका मास्तरांचे आहे.

प्रश्न-८] तुमच्या पगार विभागामध्ये कोणत्या उल्लेखनीय बाबी आहेत ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या तालुका मास्तरांच्या मतांच्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणीक्रमांक ५.३८ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३८

| तुमच्या पगार विभागामध्ये कोणत्या उल्लेखनीय बाबी आहेत ? | तालुका मास्तर संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| १] स्वतंत्र कार्यालय खोली | ० | १० | ० % | १००% |
| २] क्लार्क व शिपाई | ० | १० | ० % | १००% |
| ३] स्वतंत्र आर्थिक तरतूद | ० | १० | ० % | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, १०० % पगार विभागातील शाळेत उल्लेखलेल्या बाबी नाहीत असे मत आहे.

प्रश्न-९] तुमच्या पगार विभागामध्ये कोणत्या अन्य बाबी असाव्यात ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या तालुका मास्तरांच्या मतांच्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.३९ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.३९

| तुमच्या पगार विभागामध्ये कोणत्या अन्य बाबी असाव्यात ? | तालुका मास्तर संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| १] कार्यालय स्वतंत्र खोली | १० | ० | १००% | ० |
| २] क्लार्क व शिपाई | १० | ० | १००% | ० |
| ३] स्वतंत्र आर्थिक तरतूद | १० | ० | १००% | ० |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, पगारविभागातील सर्व तालुकामास्तरांना आपल्या पगारविभागात कार्यालयाची स्वतंत्र खोली, क्लार्क व शिपाई तसेच स्वतंत्र अशी आर्थिक तरतूद असावी असे वाटते.

प्रश्न-१०] केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्याकडून पर्यवेक्षण व्यवस्थित होते काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.४० मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.४०

| केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्याकडून पर्यवेक्षण व्यवस्थित होते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५ | ५० % |
| नाही | ५ | ५० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, केंद्रमुख्याध्यापक, विस्तार अधिकारी यांच्याकडून पर्यवेक्षण व्यवस्थित होते, असे मत असणाऱ्या तालुकामास्तरांची संख्या ५० % इतकी आहे. व पर्यवेक्षण व्यवस्थित होत नाहीअसे मत असणाऱ्या तालुकामास्तर यांची संख्या ५० % इतकी आहे. सध्या १० शाळांना एक केंद्रप्रमुख नेमलेला आहे. पण त्यांना अशैक्षणिक कामे, व कार्यालयीन कामामधुन शाळा पर्यवेक्षणासाठी वेळ मिळत नाही. कारकुनी कामे जास्त प्रमाणात करावी लागतात. विस्तार अधिकारी केंद्रप्रमुखावर बऱ्याच वेळा जबाबदाऱ्या सोपवून बाजूस राहताना दिसतात.

प्रश्न-११] शिक्षक बदली धोरण आपणास योग्य वाटते काय ? नसल्यास ते कसे असावे ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.४१ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.४१

| शिक्षक बदली धोरण आपणास योग्य वाटते काय ? नसल्यास ते कसे असावे. | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८ | ८० % |
| नाही | २ | २० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शिक्षक बदली धोरण योग्य आहे. असे म्हणणाऱ्या तालुका मास्तरांची संख्या ८० % इतकी आहे. व शिक्षक बदली धोरण अयोग्य आहे असे म्हणणाऱ्या तालुकामास्तरांची संख्या २०% इतकी आहे.

२० % तालुकामास्तरांचे असे मत दिसुन येते की, शिक्षकबदली धोरण हे राज्यकर्त्यांच्या किंवा स्थानिक प्रतिनिधींच्या दबावावर अवलंबून आहे.

त्यासाठी प्रतिनिधींचा अथवा राजकीय हस्तक्षेप होवू न देता प्रशासकांनी योग्य निर्णय घ्यावेत असे आहे.

प्रश्न-१२] जिल्हा परिषद शिक्षण समितीत आपणास सदस्य असावे असे वाटते का ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.४२ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.४२

| जिल्हा परिषद शिक्षण समितीत आपणास सदस्यत्व असावे असे वाटते का ? | तालुकामास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| असावे | १० | १०० % |
| नको | ० | ० |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जिल्हा परिषद शिक्षण समितीत आपणास सदस्यत्व असावे असे १०० % तालुका मास्तरांचे मत आहे.

प्रश्न-१३] कार्यालयीन कामामध्ये आपले दररोज सरासरी किती तास खर्च होतात ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.४३ मध्ये दिले आहे.

सारणी क्रमांक ५.४३

| कार्यालयीन कामामध्ये आपले दररोज सरासरी किती तास खर्च होतात. | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १ तास | ० | ० % |

सारणी क्रमांक ५.४३ -

| कार्यालयीन कामामध्ये आपले दररोज सरासरी किती तास खर्च होतात ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २ तास | ० | ० % |
| ३ तास | ० | ० % |
| ४ तास | ३ | ३० % |
| ५ तास | ७ | ७० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, कार्यालयीन कामामध्ये तालुका मास्तरांचे दररोज सरासरी एक तास, दोन तास, तीन तास, खर्च होतात असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या शुन्य आहे. ४ तास खर्च होतात असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ३० % इतकी आहे. ५ तास खर्च होतात असे म्हणणा-या तालुका मास्तरांची संख्या ७० % इतकी आहे.

थोडक्यात तालुका मास्तरांना कार्यालयीन कामे जास्त प्रमाणात आहेत. त्यांचा फारच वेळ सदर कामामध्ये खर्च होत असल्याने दैनंदिन काम व अध्यापनाचे काम करणे अडचणीचे होते. त्यामुळे शाळेच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो.

प्रश्न-१४) तुमच्या दृष्टिने पंचायत समितीने या पाच वर्षात कोणते चांगले शैक्षणिक निर्णय घेतले आहेत ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ५.४४ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ५.४४

| तुमच्या दृष्टिने पंचायत समितीने या पाच वर्षात कोणते चांगले निर्णय घेतले आहेत ? | तालुका मास्तर संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही |
| १] स्काऊट गाईड, कब-बुलबुल मेळावे आयोजनास उत्तेजन | १० | ० | १००% | ०% |
| २] स्वच्छ, सुंदर शाळा कार्यक्रम | १० | ० | १००% | ०%: |
| ३] प्रशिक्षणास प्रोत्साहन | १० | ० | १००% | ०% |
| ४] आरोग्यशिबीरे | १० | ० | १००% | ०% |
| ५] विज्ञानप्रदर्शने | १० | ० | १००% | ०% |
| ६] क्रिडा स्पर्धांना प्रोत्साहन | १० | ० | १००% | ०% |
| ७] इमारत बांधकामे | १० | ० | १००% | ०% |
| ८] शिक्षक बदली धोरण | १० | ० | १००% | ०% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, १००% तालुकामास्तरांच्या मते सारणीत उल्लेखलेले ८ महत्वाचे निर्णय या पाच वर्षात पंचायत समितीने घेतलेले आहेत.

प्रश्न-१५] वरिष्ठाधिकारी पगार विभागाला वर्षातून किती भेटी देतात ?

प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या तालुका मास्तरांच्या मतांच्या प्रतिसादाचे वर्गीकरणसारणी क्रमांक ५.४५ मध्ये केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.४५</u>

| वरिष्ठ अधिकारी पगार विभागाला वर्षातून किती भेटी देतात ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ० भेटी | २ | २० % |
| १ भेट | ३ | ३० % |
| २ भेटी | ३ | ३० % |
| ३ भेटी | २ | २० % |
| ४ भेटी | – | – |
| ५ भेटी | – | – |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, वरिष्ठ अधिकारी पगार विभागाला वर्षातून एकही भेट देत नाहीत असे मत असणाऱ्या तालुका मास्तरांची संख्या २० % इतकी आहे. वर्षातुन एक भेट देतात असे मत असणाऱ्या तालुका मास्तरांची संख्या ३० % इतकी आहे. २ भेटी देतात असे मत असणाऱ्या तालुका मास्तरांची संख्या २० % इतकी आहे. वर्षातून ४ व ५ भेटी देतात असे मत असणाऱ्या तालुका मास्तरांची संख्या शून्य आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पगार विभागास भेटी झाल्यानंतर अनेक समस्यांचे निराकरण होण्यास मदत होते, मार्गदर्शन मिळते. यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वारंवार भेटी व्हाव्यात.

प्रश्न-१५] पगार विभागातील सर्व शाळांना पुरेसा अर्थपुरवठा होतो काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तर यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.४६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ५.४६</u>

| पगार विभागातील सर्व शाळांना पुरेसा अर्थपुरवठा होतो काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ० | ० % |
| नाही | १०० | १०० % |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, पगार विभागातील सर्व शाळांना पुरेसा अर्थपुरवठा होत नाही असे मत असणा-या तालुका मास्तरांचे प्रमाण १०० % इतके आहे.

शाळेचा गुणात्मक व संख्यात्मक दर्जा वाढायचा असेल तर पुरेसा अर्थपुरवठा होणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रश्न-१७] वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तरांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ४.४७ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ४.४७</u>

| वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते काय? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १० | १०० % |
| नाही | - | - |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, वार्षिक अर्थसंकल्पापूर्वी शाळांच्या गरजांची माहिती मागविली जाते असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या १०० % आहे.

प्रश्न-१८] शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने शिक्षक, समाज यांचे सहकार्य मिळते काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तर यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.४८ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.४८

| शैक्षणिक गुणवत्तावाढीच्यादृष्टीने शिक्षक, समाज यांचे सहकार्य मिळते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५ | ५० % |
| नाही | ५ | ५० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने शिक्षक व समाजाचे सहकार्य मिळते असे मत दर्शविणा-या तालुका मास्तरांची संख्या ५० % इतकी आहे. व शिक्षक आणि समाज यांचे सहकार्य मिळत नाही असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ५० % इतकी आहे. यासाठी शिक्षक-पालक संघ स्थापन करून शाळांच्या विविध समस्या पालकांच्याकडून सोडविण्याचा प्रयत्न व्हावा. पालक मेळावे घेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन व्हावे. समाजातील विविध संस्था व शाळा यांच्यामध्ये सुसंवाद असणे गरजेचे आहे.

प्रश्न-१९] आपणास काम करत असताना समाजाचे/अधिका-याचे दडपण येते काय ? याप्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.४९ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.४९

| आपणास काम करत असताना समाजाचे/ अधिका-याचे दडपण येते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४ | ४० % |
| नाही | ६ | ६० % |

सारणी क्रमांक ४.४९ वरून असे निदर्शनास येते की, तालुका मास्तरांना काम करत असताना समाजाचे व अधिका-यांचे दडपण येते असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ४० % इतकी आहे आणि समाजाचे व अधिका-यांचे दडपण येत नाही असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ६० % आहे.

समाजाचे व वरिष्ठांचे दडपण येवू नये यासाठी स्वत: कर्तव्यदक्ष असावे. नियमितपणा, सचोटी, कार्यक्षमता, कुशलता, नेतृत्व क्षमता, चारित्र्यसंपन्नता, ज्ञानसाधना असल्यास सर्व समस्यांना तोंड देता येते.

प्रश्न-२०] अधिकारी आपल्या कामामध्ये हस्तक्षेप करतात काय ?

प्रस्तुत प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे खालील सारणी क्रमांक ५.५० मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.५०

| अधिकारी आपल्या कामामध्ये हस्तक्षेप करतात काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २ | २० % |
| नाही | ८ | ८० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, अधिकारी कामामध्ये हस्तक्षेप करतात असे मत असणा-या तालुका मास्तरांचे प्रमाण २० % इतके आहे व कामामध्ये हस्तक्षेप करीत नाहीत असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ८० % इतकी आहे.

प्रश्न-२१] असल्यास सदरच्या कामामधील हस्तक्षेपामुळे आपल्या शाळेच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तर यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.५१ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.५१

| असल्यास सदरच्या कामामधील हस्तक्षेपामुळे आपल्या शाळेच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे असे वाटते काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २ | २० % |
| नाही | ८ | ८० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, तालुका मास्तरांच्या कामामध्ये अधिका-यांच्या हस्तक्षेपामुळे शाळेच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या २० % इतकी आहे व गुणवत्तेवर परिणाम झाला नाही असे मत असणा-या तालुका मास्तरांची संख्या ८० % इतकी आहे.

प्रश्न-२२] तालुका मास्तरचे काम करीत असताना आपल्या कार्यामध्ये कसूर झाली म्हणून शिक्षा झाली आहे काय ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तर यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.५२ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.५२

| तालुका मास्तरचे काम करीत असताना आपल्या कार्यामध्ये कसूर झाली म्हणून शिक्षा झाली आहे काय ? | तालुका मास्तर संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | - | - |
| नाही | १० | १०० % |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, तालुका मास्तरचे काम करीत असताना कार्यामध्ये कसूर झाली म्हणून शिक्षा झाली नाही असे मत

असणा-या तालुका मास्तरांची संख्या १०० % इतकी आहे.

प्रश्न-२३] प्रचलित तालुका मास्तरच्या कार्यपध्दतीत कोणते बदल असावेत असे आपणांस वाटते ? गुणदोष सांगा ?

प्रस्तुत प्रश्नास तालुका मास्तर यांचेकडून मिळालेल्या प्रतिसादानुसार त्यांनी सुचविलेल्या बदलांचा व गुणदोषांचा तपशील -

तालुका मास्तर हे पद स्वतंत्र असावे. तालुका मास्तरांना कराव्या लागणा-या कामास सहाय्य करण्यासाठी एक लेखनिक व एक शिपाई असावा. पगार विभागामधील आर्थिक व्यवहार पाहण्यास व साधन सुविधांची स्थिती व पुरवठ्यासाठी शिफारशी करण्याचे अधिकार मिळावेत. तालुका मास्तरना पगार विभागातील शाळांच्या भेटीचा प्रवास भत्ता व प्रवास भाडे मिळावे म्हणजे कामामध्ये लवचिकता साधली जाईल. आठवड्यातून अध्यापनाच्या मार्गदर्शनपर फक्त पाचच तासिका असाव्यात. तासिकांचे स्वरुप मार्गदर्शनपर असावे. शिक्षक सभा, घेवून शिक्षकांना, मुख्याध्यापकांना तालुका मास्तरकडून मार्गदर्शन मिळावे इत्यादी बदल सुचविलेले आहेत.

## ५.४] केंद्रप्रमुख प्रश्नावलीचे विश्लेषण :-

प्रास्ताविक -

केन्द्रप्रमुखांचे अधिकार, कर्तव्ये व समस्यांचा अभ्यास करण्यासाठी केन्द्रप्रमुखांना प्रश्नावल्या दिल्या. केन्द्रप्रमुखांचेकडून प्राप्त प्रश्नावलींचे विश्लेषण खालील-प्रमाणे केले आहे.

अ. केंद्रप्रमुखाबद्दलची सर्वसामान्य माहिती -

१. प्रश्नावली भरणा-याचे नांव -

२. पद व कार्यालयीन पत्ता -

३. वय

सारणी क्रमांक -१

| वयोगट | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २५ ते ४० वर्षे | ० | ०% |
| ४० ते ५० वर्षे | १५ | ७५% |
| ५० चे पुढे | ५ | २५% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, २५ ते ४० वर्षे वयोगटातील केंद्रप्रमुखांची संख्या शुन्य टक्के इतकी आहे. ४० ते ५० वर्षे वयोगटातील केंद्रप्रमुखांची संख्या ७५ टक्के इतकी आहे. व ५० वर्षे वयाच्या पुढील केंद्रप्रमुखांची संख्या २५ टक्के इतकी आहे. सदर पदे ही पदवीधर प्रशिक्षकांच्या सेवाजेष्ठते मधुन भरली जातात. पदाची भरती करत असताना ती विशिष्ट शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या वर्षा-पासूनची सेवाजेष्ठता यादी तयार करुन भरण्यात यावीत. २५ ते ४० वर्षे वयोगटातील केंद्रप्रमुख हे ४० ते ६० वर्षे वयो गटातील केंद्रप्रमुखापेक्षा अधिक व प्रभावी काम करुन शकतील. अशा कार्यक्षम, उत्साही, तरुण केंद्रप्रमुखांची नियुक्ती होणे ही काळाची गरज आहे. पदवीधर शिक्षक म्हणुन ज्यांना अध्यापनाचा दोन वर्षांचा अनुभव आहे. अशा शिक्षकांची चाळणी परीक्षा घेवुन सदर पदावर त्यांच्या नियुक्त्या कराव्यात.

सारणी क्रमांक -२

| | शैक्षणिक पात्रता | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पदवीधर प्रशिक्षित कला विभाग | १५ | ७५ टक्के |
| २. | विज्ञान विभाग | ० | ० टक्के |
| ३. | पदव्युत्तर प्रशिक्षित | ५ | २५ टक्के |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ७५ टक्के केंद्रप्रमुख हे पदवीधर प्रशिक्षित आहेत. सर्व केंद्रप्रमुख कला शाखेचे पदवीधर आहेत. पदव्युत्तर प्रशिक्षित केंद्र प्रमुखाचे प्रमाण २५ टक्के इतके आहे. विज्ञान शाखेचे पदवी धर कोणीही केंद्रप्रमुख नाहीत.

सद्यस्थितीत १२ वी च्या परीक्षेनंतर गुणवत्ते नुसार डी.एड्.साठी प्रवेश दिला जातो. यामध्ये कला शाखेचे ६० टक्के विद्यार्थी, विज्ञान शाखेचे ३० टक्के विद्यार्थी व वाणिज्य शाखेचे १० टक्के विद्यार्थी घेतले जातात. या शिवाय कला, वाणिज्य,व विज्ञान विषयातील पदवी मिळ-विलेल्या विद्यार्थ्यांना डी.एड्.प्रशिक्षण व पदव्युत्तर पदवी [एम.ए.एम.एसी.एम.कॉम] मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बी.एड. प्रशिक्षण देवुन चाळणी परीक्षा घेवुन भरती करण्यात यावी. केंद्रप्रमुख हे पदव्युत्तर पदवी धारण केलेले असावेत. कला, विज्ञान,वाणिज्य शाखांना सारखे महत्व व दर्जा देण्यात यावा

सारणी क्रमांक -३

| अनुभव | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १. नविन | १६ | ८० टक्के |
| २. ३ वर्षापेक्षा जास्त | ४ | २० टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, नविन नेमणुका झालेल्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण ८० टक्के इतके आहे. व ३ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या केंद्रप्रमुखांची संख्या २० टक्के इतकी आहे. केंद्रप्रमुखांची पदे ही नव्यानेच इ.सन १९९५ पासून भरलेली आहेत. इ.सन. १९९५ पूर्वी संपूर्ण सांगली जिल्हयातील केंद्रशाळामध्ये केंद्रप्रमुख म्हणून जे काम करीत होते त्यांना केंद्रमुख्याध्यापक म्हणत असत.

ब] १] सारणी क्रमांक - ४

| | उद्दिष्टे | केंद्रप्रमुख संख्या | पसंती क्रमांक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत करणे. | २० | १ | १०० टक्के |
| २. | प्रौढ नागरिकांना प्रौढ शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे. | २० | ५ | १०० टक्के |
| ३. | प्राथमिक शाळांना वारं वार भेटी देवुन मार्ग-दर्शन देणे. | २० | ३ | १०० टक्के |

| उद्दिष्टे | केंद्रप्रमुख | पसंती | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ४. शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी शिबीरे उद्बोधन वर्ग घेणे. | २० | २ | १०० टक्के |
| ५. प्राथमिक शाळांना साहित्य साधने मिळ विण्यासाठी उपक्रम सुचविणे. | २० | ४ | १०० टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, उद्दिष्ट क्रमांक एकला पसंतीक्रमांक एक दिलेल्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. उद्दिष्ट क्रमांक ४ ला द्वितीय पसंती दिलेल्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. उद्दिष्ट क्रमांक तीनला तृतीय पसंती दिलेल्या केंदप्रमुखाचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. उद्दिष्ट क्रमांक ५ ला चार क्रमांकाची पसंती दिलेल्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. उद्दिष्ट क्रमांक २ ला ५ पसंती क्रमांक दिलेल्या केंद्रप्रमुखाचे प्रमाण १०० टक्के आहे.

सारणी क्रमांक - ५

| २] आपल्या केंद्रामधील उपलब्ध सुविधाबद्दल कितपत समाधान वाटते ? | | केंद्रप्रमुखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | इमारती | १५ | ७५ टक्के |
| २. | शैक्षणिक साहित्य | ६ | ३० टक्के |
| ३. | ग्रंथालय | २ | १० टक्के |
| ४. | क्रिडांगण | १० | ५० टक्के |
| ५. | शिक्षक संख्या | १६ | ८० टक्के |
| ६. | केंद्रप्रमुखाचप व्यावसायिक दर्जा | १० | ५० टक्के |
| ७. | कामासाठी उपलब्ध वेळ | १० | ५० टक्के |
| ८. | पुरेसे अर्थसहाय्य | १० | ५० टक्के |
| ९. | समाजाचे सहकार्य | ८ | ४० टक्के |
| १० | अधिका-याचे मार्गदर्शन | ९ | ४५ टक्के |

१. वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ७५ टक्के केंद्रप्रमुखांना आपल्या कार्यक्षेत्रातील इमारतीच्या उपलब्धतेबद्दल समाधान वाटते.

२. ३० टक्के केंद्रप्रमुखांना शैक्षणिक साहित्य उपलब्धतेबद्दल समाधान वाटते.

३. १० टक्के केंद्रप्रमुखांना ग्रंथालयाच्या सुविधाबद्दल समाधान वाटते.

४. ५० टक्के केंद्रप्रमुखांना क्रिडांगण उपलब्धतेबद्दल समाधान वाटते.

५. ८० टक्केकेंद्रप्रमुखांना शिक्षक संख्येबद्दल समाधान वाटते.

६. ५० टक्के केंद्रप्रमुखांना केंद्रप्रमुखाच्या व्यावसायिक दर्जाबद्दल समाधान वाटते..

७. ५० टक्के केंद्रप्रमुखांना कामासाठी उपलब्ध वेळेबद्दल समाधान वाटते.

८. ५० टक्के केंद्रप्रमुखाचे पुरेसे अर्थसहाय्य होते असे आहे अर्थसहायाबद्दल त्यांना समाधान वाटते. ५० टक्के केंद्र प्रमुखांना असमाधान वाटते.

९. समाजाच्या सहकार्याबद्दल ४० टक्के केंद्रप्रमुखांना समाधान वाटते.

१०. अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाबद्दल ४५ टक्के इतक्या केंद्र प्रमुखांना समाधान वाटते.

अलिकडे केंद्रप्रमुखांना केंद्रामध्ये शैक्षणिकबाबी, प्रवास, सभा याकारणाकरिता २० हजार रुपये प्रतिवर्षी दिले जातात. शिवाय शिक्षकांच्या पगाराच्या ४ टक्के इतका सादील रक्कम शासन मान्य करते. त्यामुळे गतवर्षीपासून प्राथमिक शाळांमध्ये खेळाचे साहित्य, विज्ञानप्रयोग साहित्य, पुस्तके, तक्ते, टेपरेकॉर्डर, रेडिओ, टि.व्ही. कपाटे इत्यादि साधने विकत घेता येतात. याशिवाय वरील पैकी साहित्य शासनही पुरविते. मात्र आज वाडी वस्तीच्या शाळामध्ये अपूर्ण आहे. त्यामुळे वर्ग ४ व शिक्षक २ अशी अवस्था आहे. त्याचबरोबर इतर शाळामधून रिक्त पदे लवकर भरली जात नाहीत ती भरणे गरजेचे आहे.

३]  १० प्राथमिक शाळांना एक केंद्रप्रमुख अशी पदे मंजुर करण्यात आली आहेत.

केंद्रप्रमुख हा शिक्षण विभागाचा पहिला पर्यवेक्षक आहे. ग्रामीण भागात शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारा व शाळा व प्रशासन यामधील [समन्वयक] दुवा आहे.

सारणी क्रमांक ६

| वरील विधानाशी आपण सहमत आहात का ? | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २० | १०० टक्के |
| नाही | ० | ० टक्के |

२]  केंद्रप्रमुखाच्या कार्याचे स्वरुप फक्त मार्गदर्शनाचे असावे असे १०० टक्के केंद्रप्रमुखांचे मत आहे. केंद्रप्रमुख ग्रामशिक्षण समितीच्या सभांचे आयोजन दर महिन्याला करुन शाळा व समाज एकत्र आणून समाजाच्या गरजा, अपेक्षा जाणुन घेतील. शिक्षक व समाज यांच्यामध्ये आंतरक्रिया घडून शिक्षण हे समाजाभिमूख करण्याचा प्रयत्न करतील. शाळांच्या गरजा समाजामार्फत पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न करतील. राजकीय व्यक्तींचा शाळेच्या विकासासाठी उपयोग करुन घेतील.

सारणी क्र. - ७

| पदाच्या निर्मितीमुळे विस्तार अधिका-यांच्या कामाचा ताण कमी झालेली आहे काय ? | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २० | १०० टक्के |
| नाही | -- | ० टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, केंद्र प्रमुखांच्या नियुक्तीमुळे विस्तार अधिका-यांच्या कामाचा ताण कमी झाला आहे असे १००% केंद्रप्रमुखांचे मत आहे. केंद्रप्रमुखाच्या नियुक्तीच्या अगोदर वारंवार शाळांना भेटी व मार्गदर्शन, माहितीसंकलन, शिबीरे,समेलने, शाळा तपासणी व इतर अशैक्षणिक कामे शिक्षण विस्तार अधिका-यांना करावी लागत असत. मात्र या कामाची जबाबदारी सद्यस्थितीत केंद्रप्रमुखांच्यावर येवुन पडली आहे. त्यामुळे साहजिकच शिक्षण विस्तार अधिका-यांच्या कामाचा ताण कमी झालेला आहे.

४] केंद्रप्रमुखाच्या अधिकाराचे क्षेत्र मर्यादित आहे काय ?

सारणी क्रमांक - ८

| | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १२ | ६० टक्के |
| नाही | ८ | ४० टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ६० टक्के केंद्र प्रमुखाच्या मतानुसार अधिकाराचे क्षेत्र मर्यादित झाले आहे व ४०

केंद्रप्रमुखांच्या मतानुसार अधिकार क्षेत्र मर्यादित झाले नाही असे दिसून येते. केंद्रप्रमुखांना कार्यक्षेत्रातील सर्व शाळेतील शिक्षकाचे गोपनिय अभिलेख लिहीण्याची परवानगी असावी. मुख्याध्यापकांच्या कामातील हलगर्जीबद्दल कारवाई करण्याचा अधिकार असावा. सदर अधिकार केंद्रप्रमुखांना मिळाल्यास केंद्रप्रमुखांचा दबाव शिक्षक व मुख्याध्यापकांवर पडून शिक्षणाच्या कार्याला निश्चितपणे . गती प्राप्त होईल.

५] पदवीधर शिक्षक म्हणून काम करीत असताना व सध्याच्या पदावर काम करीत असताना आपणास कोणते नवीन अनुभव मिळाले.

१] कामाचे निश्चित स्वरुप नाही असे मत असणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण ४० टक्के इतके आहे.

२] ६० टक्के केंद्रप्रमुखांचे मत असे आहे की, केंद्र प्रमुखांना कारकुनी काम पह करावे लागते. त्याशिवाय अशैक्षणिक कामे करावी लागतात. त्यामुळे मार्गदर्शनपर तासीका घेणे शाळांना वारंवार भेटी देणे, शिबीरे संमेलने घेणे यासाठी फारसा वेळ मिळत नाही त्याचा शिक्षण कार्यावर विपरीत परिणाम होतो.

४] <u>प्राथमिकशिक्षकाविषयीची कर्तव्ये</u>

१. शैक्षणिक शिबीरे, चर्चासत्रे आयोजित करणे.

२. शिक्षणक्षेत्रातील आधुनिक विचारप्रवाहांचा शिक्षकांना परिचय करुन देणे.

३. शिष्यवृत्ती करिता विद्यार्थ्यांना तयार करणेस शिक्षकांना मार्गदर्शन करणे.

४. शिक्षकांच्या अध्यापनविषयक कामाचावाटणीत फेरफार करणे.

५. आलेल्या तक्रारी अर्जांची चौकशी करणे व त्या संबंधी अहवाल पाठविणे.

६. प्रत्येक शाळेमध्ये मार्गदर्शनपर तासिका घेणे.

प्रश्न = अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?

१. शिक्षकांचे गोपनीय अभिलेख लिहिणे.

२. शिक्षकांच्या रजा मंजुर करणे.

३. शिक्षकांना वेतनवाढीबद्दलची शिफारस करता येणे.

ब] या गटातील कोणती कर्तव्ये वगळावीत असे आपणास वाटते ?.

कर्तव्य क्र. ६ : प्रत्येक शाळेमध्ये मार्गदर्शनपर तासिका घेणे हे कर्तव्य वगळावे असे ७० टक्के इतक्या केंद्रप्रमुखांना वाटते.

५] कार्यालयाविषयीची कर्तव्ये

१. स्वत:चे दप्तर काळजीपूर्वक ठेवणे.

२. आपल्या केंद्रातील शाळाविषयीची सर्वकष माहितीची नोंद ठेवणे.

३. शाळाकडून मागविलेल्या माहितीचे संकलन करणे व खात्याकडे पाठविणे.

४. स्वत:कडे असलेल्या योजनासंबंधी पत्रव्यवहार करणे.

प्रश्न : अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?
वरील कर्तव्ये पुरेशी आहेत असे ९० टक्के केंद्र प्रमुखाचे मत आहे.

ब] या गटातील कोणती कर्तव्ये वगळावीत असे आपणास वाटते ?
सर्व कर्तव्ये योग्य आहेत असे १०० टक्के केंद्रप्रमुखाचे मत आहे.

६] जनसंपर्क विषयक कर्तव्ये

१] ग्रामशिक्षण समितीच्या भेटी घेवुन शालेय व्यवस्था पनाबद्दल चर्चा करणे.

२] शिक्षक समाज व शाळा एकत्र आणुन शाळा सुधार मोहिम कार्यान्वित करणे.

३] शैक्षणिक प्रदर्शन व शैक्षणिक स्पर्धा आयोजित करणे.

४] शाळा समुह योजना, दत्तक शाळा योजना, इत्यादि उपक्रम कार्यान्वित करणे.

५] समाज शिक्षण मोहिमेस उत्तेजन देणे.

६] ग्रामीण वाचनालयाची तपासणी करणे व अनुदानाची शिफारस करणे.

प्रश्न : अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?

वरील कर्तव्ये पुरेशी आहेत असे १०० टक्के इतक्या केंद्रप्रमुखाचे मत आहे.

ब] या गटातील यादीत कोणती कर्तव्ये वगळावीत असे आपणास वाटते ?

समाज शिक्षण मोहिमेस उत्तेजन देणे.

ग्रामीण वाचनालयाची तपासणी करणे व अनुदानाची शिफारस करणे. वरील दान कर्तव्ये वगळावीत असे ६० टक्के इतक्या केंद्रप्रमुखांना वाटते.

७] केंद्रप्रमुखाचे शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांच्याशी संबंध कसे असावेत ?

सारणी क्र. - ९

| शिक्षणविस्तारअधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांच्याशी आपले संबंध कसे आहेत ? | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बरे | ८ | ४० टक्के |
| चांगले | १० | ५० टक्के |
| वाईट | २ | १० टक्के |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्याशी ४०% केंद्रप्रमुखांचे संबंध बरे आहेत. ५० टक्के केंद्रप्रमुखांच्या मतानुसार शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्याशी केंद्रप्रमुखांचे वैयक्तिक संबंध हे चांगल्या स्वरूपाचे आहेत. १० टक्के केंद्रप्रमुखांच्या मते त्यांचे शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचेशी संबंध चांगल्या स्वरूपाचे नाहीत. केंद्रप्रमुखांचे शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचेशी संबंध चांगल्या स्वरूपाचे असावेत. अधिकार, एकवाक्यता, कामाची वाटणी, नियोजनातील बदल, राष्ट्रीय कामे, परीक्षा इत्यादी बाबी सहकार्याशिवाय शक्य होत नाहीत.

९] १० शाळांवरती एक केंद्रप्रमुख ही व्यवस्था परिणामकारक आहे काय? परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाय सुचवा ?

सारणी क्र. १०

| | केंद्रप्रमुख संख्या | टक्केवारी |
| --- | --- | --- |
| होय | २० | १०० टक्के |
| नाही | - | - |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, १० शाळेवरती एक केंद्रमुख्याध्यापक ही व्यवस्था परिणामकारक आहे असे मत असणा-या केंद्रप्रमुखांची संख्या १०० टक्के इतकी आहे.

उपाय :-

१] केंद्रप्रमुखांना केंद्रामधील १० शाळा संबंधीचे सर्व अधिकार असावेत.

२] केंद्रप्रमुखांच्या वेतनश्रेणीमध्ये भरीव वाढ व्हावी.

३] प्रत्येककेंद्रामध्ये स्वतंत्र वाचनालये व प्रयोग शाळा असाव्यात.

४] केंद्रप्रमुखांना वेळोवेळी प्रशिक्षण द्यावे.

वरील उपाय परिणामकारकता वाढविण्यासाठी ९० टक्के इतक्या केंद्रप्रमुखांनी सुचविले आहेत.

सारणी क्र. - ११

| कार्याचे स्वरूप | केंद्रप्रमुख संख्या | खर्च असलेल्या वेळेची टक्केवारी [सरासरी] |
|---|---|---|
| १. प्राथमिक शाळांना भेटी व मार्गदर्शन | २० | ४५ टक्के |
| २. प्राथमिक शाळांची तपासणी | २० | ४ टक्के |
| ३. अनौपचारीक संस्थांना भेटी व पर्यवेक्षण [प्रौढशिक्षणकेंद्रे] | २० | ३ टक्के |
| ४. प्रवास | २० | ८ टक्के |
| ५. समाजशिबिरे व संमेलने | २० | ५ |
| ६. शिक्षणविस्तार अधिकारी व विभागातील लोक प्रतिनिधी यांच्याशी/चर्चा | २० | ८ |
| ७. कार्यालयीन काम | २० | २० |
| ८. इतर | २० | ७ |
| ९. एकूण | | १०० टक्के |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, प्राथमिक शाळांना भेटी व मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रप्रमुखाचा सरासरी ४५ टक्के इतका वेळ खर्च होतो असे सर्व केंद्रप्रमुखाचे मत आहे.

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, प्राथमिक शाळांना भेटी व मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रप्रमुखांचा सरासरी ४५ टक्के इतका वेळ खर्च होतो असे सर्व केंद्रप्रमुखांचे मत आहे.

प्राथमिक शाळांच्या तपासणीसाठी ४ टक्के, अनौपचारीक संस्थांना भेटी व पर्यवेक्षणासाठी ३ टक्के प्रवासासाठी ८ टक्के समाजशिबिरे व संमेलने यासाठी ५ टक्के शिक्षण विस्तार अधिकारी व विभागातील प्रतिनिधी यांच्याशी चर्चेसाठी ८ टक्के, कार्यालयीन कामा साठी २० टक्के, व इतर कामासाठी ७ टक्के, इतका वेळ खर्च होतो. वरील टक्केवारी २० केंद्रप्रमुखांनी वेगवेगळया स्वरुपात दिली होती. प्रत्येक कामाच्या स्वरुपानुसार त्या कामासाठी प्रत्येकांनी दिलेल्या वेळेच्या प्रतिसादानुसार वेळेची सरासरी काढली व टक्केवारी दिली.

ब] शिक्षण विभागाशी संबंधीत नसणारी कोणती कामे आपणास करावी लागतात.

प्रतिसाद :- प्रौढ साक्षरता कार्यक्रमात सहभाग

२] दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण कामात सहकार्य.

३] आरोग्यविषयक मोहिमांना सहकार्य

४] पचायत समिती नविन योजनांची माहिती देणे इत्यादी कामे करावी लागतात. असे १० टक्के केंद्रप्रमुखांचे मत आहे.

## ९] केंद्रप्रमुखांच्या कार्यप्रेरणेवर परिणाम करणारे घटक

### सारणी क्र.-१२

| अ.क्र. | कार्यप्रेरणेवर परिणाम करणारे घटक | केंद्रप्रमुखांची संख्या[२०] | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समाधान | साधारण | असमाधान | समाधान | साधारण | असमाधान |
| १. | वेतनश्रेणी व आर्थिक लाभ | १ | ४ | १५ | ५ | २० | ७५ |
| २. | पदोन्नतीची संधी | १ | ५ | १४ | ५ | २५ | ७० |
| ३. | चांगल्या कामाबद्दल गुणग्रहण | २ | ६ | १२ | १० | ३० | ६० |
| ४. | सेवा शाश्वती | ११ | ९ | -- | ५५ | ४५ | - |
| ५. | प्राथमिक शिक्षकांची कामाकडे पाहण्याची वृत्ती | ५ | ६ | ९ | २५ | ३० | ४५ |
| ६. | राजकीय कार्यकर्त्यांचे सहकार्य | २ | ८ | १० | १० | ४० | ५० |
| ७. | कामाचा जादा व्याप | २ | २ | १६ | १० | १० | ८० |
| ८. | वरिष्ठांचे प्रोत्साहन | २ | ४ | १४ | १० | २० | ७० |
| ९. | कनिष्ठांचे आज्ञा पालन | ८ | ४ | ८ | ४० | २० | ४० |
| १०. | वरिष्ठांचे मार्गदर्शन | ८ | ६ | ६ | ४० | ३० | ३० |
| ११ | ग्रामशिक्षण समितीचे सहकार्य | ६ | ८ | ६ | ३० | ४० | ३० |
| १२. | मुख्याध्यापकांचे सहकार्य | १० | ६ | ४ | ५० | ३० | २० |
| १३. | तालुका मास्तरचे सहकार्य | ११ | ७ | २ | ५५ | ३५ | १० |
| १४. | माध्यमिक शाळांचे सहकार्य | ८ | ६ | ६ | ४० | ३० | ३० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५. | प्रशिक्षण | ४ | ४ | १२ | २० | २० | ६० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की,

१. वेतनश्रेणी व आर्थिक लाभ याबाबतीत ७५ टक्के केंद्रप्रमुख असमाधानी आहेत. त्यांना वेतनश्रेणीमध्ये वाढ होणे जरूरीचे आहे.

२. पदोन्नतीची संधी केंद्रप्रमुखांना अल्पप्रमाणात आहे कारण सिनिऑरिटीप्रमाणे शिक्षणविस्तार अधिका-याच्या जागा भरल्या जातात. याशिवाय एम.पी.एस.सी परीक्षेसाठी वय जास्त होते. कारण केंद्रप्रमुखाचे वय साधारणपणे ४० चे पुढे आहे. [ सारणी क्रमांक १ वरून]

७० टक्के केंद्रप्रमुखांना आपल्याला पदोन्नतीची संधी नाही असे वाटते.

३. ६० टक्के केंद्रप्रमुखाचे मत असे आहे की, चांगल्या कामाचे चीज होत नाही. कितीही काम केले तरी त्या कामाचे कौतुक कोणी करीत नाही.

चांगल्या कामाबद्दल गुणग्रहण झाले तर केंद्रप्रमुखांच्या कार्यावर निश्चित परीणाम होतो.

४.७ सेवा शाश्वतीबाबत ५५ टक्के केंद्रप्रमुखांना समाधान वाटते. ४५ टक्के केंद्रप्रमुखांची सेवा समाप्तीची भिती वाटत नाही. केंद्रप्रमुखांना सेवेची शाश्वती मात्र आहे हे दिसुन येते.

५. प्राथमिक शिक्षकांच्या कामाकडे पाहण्याच्या वृत्ती बद्दल ४५ टक्के केंद्रप्रमुखांना असमाधान वाटते. ३० टक्के केंद्रप्रमुखांना

साधारण समाधान वाटते. २५% केंद्रप्रमुखांना समाधान वाटते. अलिकडे प्राथमिकशिक्षकांच्या कामाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत व ढासळत आहे. शिक्षकांनी सेवाभावी वृत्तीने आपले काम केले पाहिजे.

६. राजकीय कार्यकर्त्यांचे सहकार्याबद्दल ५०% केंद्रप्रमुख असमाधानी आहेत. ४०% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते. राजकीय कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शिक्षणाकडे पाहणे व सहाकार्य करणे गरजेचे असते. शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न हे राजकीय कार्यकर्त्यांमार्फत सुटु शकतात.

७. ८०% केंद्रप्रमुखाचे असे मत आहे की, केंद्रप्रमुखांना कामाचा जादा व्याप आहे. त्यामुळे सर्व कामाकडे ते पुर्ण वेळ देवु शकत नाहीत.

८. ७०% केंद्रप्रमुखांचे मत असे आहे की, आपणास वरिष्ठांचे प्रोत्साहन मिळत नाही.

९. कनिष्ठांचे ह आज्ञापालन ४०% केंद्रप्रमुखांच्या मते केले जाते. २०% केंद्रप्रमुखाच्या मते साधारण स्वरुपात आज्ञा पालन कनिष्ठाकडुन होते. ४०% केंद्रप्रमुख कनिष्ठांच्या आज्ञा पालनाबद्दल असमाधानी आहेत.

१०. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाबद्दल ४०% केंद्रप्रमुखांना समाधान वाटते. ३०% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते व ३०% केंद्रप्रमुख वरिष्ठांच्या मार्गदर्शनाबाबतीत असमाधानी आहेत.

११. ग्रामशिक्षण समितीच्या सहकार्याबद्दल ३०% केंद्रप्रमुखांना समाधान वाटते. ४०% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते. ३०% केंद्रप्रमुखांना मात्र ग्रामशिक्षण समितीच्या सहकार्याबद्दल असमाधान वाटते.

१२. मुख्याध्यापकांच्या सहकार्याबद्दल ५०% केंद्र प्रमुखांना समाधान वाटते. ३०% केंद्रप्रमुखांना मुख्याध्यापकांच्या सहकार्याबद्दल साधारण सामाधान वाटते. २०% केंद्रप्रमुखांना मुख्याध्यापकांच्या सहकार्याबद्दल असमाधान वाटते.

१३. तालुका मास्तरच्या सहकार्याबद्दल ५५% केंद्र प्रमुखांना समाधान वाटते. ३५% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते. १०% केंद्रप्रमुखांना असमाधान वाटते.

१४. माध्यमिक शाळांच्या सहकार्याबद्दल ४०% केंद्र प्रमुखांना समाधान वाटते. ३०% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते. ३०% केंद्रप्रमुखांना माध्यमिक शाळांच्या सहाकार्याबद्दल असमाधान वाटते.

१५. प्रशिक्षणाच्या बाबतीत २०% केंद्रप्रमुखांना समाधान वाटते. २०% केंद्रप्रमुखांना साधारण समाधान वाटते. ६०% केंद्रप्रमुखांना प्रशिक्षणाच्या बाबतीत असमाधान वाटते. व्यवसाय करीत असताना अभ्यासक्रमातील बदल, व्यवस्थापन व प्रशासन या संदर्भात प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे.

५.५]

## शिक्षणविस्तारअधिकारी प्रश्नावलीचे विश्लेषण
### सारणी क्रमांक-१

सारणी क्रमांक १

| उद्दीष्टे | प्रतिसादक संख्या व महत्व क्रमांक | | | | | | | | | | | सरासरी | महत्वक्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | | | |
| १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १० | १ | १ |
| २ | ६ | ६ | ६ | ३ | ८ | २ | २ | ३ | २ | २ | ४० | ४ | ६ |
| ३ | ३ | ३ | ३ | २ | २ | १ | १ | ७ | १ | १ | २४ | २.४ | ३ |
| ४ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ३ | ३ | ९ | ३ | ३ | ६६ | ६.६ | ९ |
| ५ | २ | २ | २ | ४ | ३ | १ | १ | २ | १ | १ | १९ | १.९ | २ |
| ६ | ४ | ४ | ४ | ६ | ४ | १ | १ | ४ | १ | १ | ३० | ३ | ४ |
| ७ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | २ | २ | ५ | २ | २ | ३८ | ३.८ | ५ |
| ८ | ७ | ७ | ७ | ७ | ६ | २ | २ | ६ | २ | २ | ४८ | ४.८ | ७ |
| ९ | ८ | ८ | ८ | ८ | ७ | २ | २ | ८ | २ | २ | ५५ | ५.५ | ८ |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, उद्दिष्ट क्रमांक १ ला शिक्षणविभागाच्या दिलेल्या सर्व उद्दिष्टापेक्षा जास्त महत्व दिलेले आहे. सर्व शिक्षण विस्तारअधिकाऱ्यांनी उद्दिष्टक्रमांक १ ला प्रथम पसंती दर्शवली आहे. उद्दिष्ट क्रमांक ५ ला महत्व क्रमांक २, उद्दिष्ट क्रमांक ३ ला महत्व क्रमांक ३, उद्दिष्ट क्रमांक ६ ला महत्व क्रमांक ४,उद्दिष्ट क्रमांक सातला महत्वक्रमांक ५, उद्दिष्ट क्रमांक २ ला महत्वक्रमांक ६, उद्दिष्टक्रमांक ८ ला महत्व क्रमांक ७ उद्दिष्ट क्रमांक ९ ला महत्व क्रमांक ८, उद्दिष्ट क्रमांक ४ ला महत्व क्रमांक ९ दिलेला आहे.

सारणी क्रमांक २

| अ.क्र. | सुविधांचा प्रकार | प्रतिसादक संख्या | काही अंशी समाधान वाटते | निश्चीत सांगता येतनाही | काहीअंशी असमाधान वाटते | खपच असमाधान वाटते |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भौतिक सुविधा व प्राथमिक शाळांच्या इमारती | १० | ६ | १ | १ | २ |
| २. | प्राथमिक शाळांत उपलब्ध असलेलेसाहित्य | १० | २ | २ | ४ | २ |
| ३. | प्राथमिक शाळांच्या प्रयोगशाळा | १० | १ | १ | ४ | ४ |
| ४. | प्राथमिक शाळांमधल ग्रंथालय | १० | ३ | १ | ४ | २ |
| ५. | प्राथमिक शाळांमधील क्रिडांगणे व खेळाचे साहित्य | १० | ३ | १ | ३ | ३ |
| | मनुष्यबळ | | | | | |
| १. | प्राथमिक शिक्षकांची संख्या | १० | ५ | १ | २ | २ |
| २. | प्राथमिक शिक्षकांचा व्यावसायिक दर्जा | १० | ४ | १ | २ | ३ |
| ३. | शिक्षणविस्तार अधीकाऱ्यांची संख्या | १० | ३ | – | ३ | ४ |
| ४. | शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचा व्याव. दर्जा | १० | ५ | १ | २ | २ |
| | शिक्षणविस्तार | | | | | |
| | अधिकाऱ्यांना कामासाठी उपलब्ध वेळ | १० | ४ | १ | ३ | २ |

४] शिक्षणविस्तार अधिका-यांचा व्यवसायिक दर्जाबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ५०% इतकी आहे. निश्चित सांगता येत नाही. असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्या १०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

शिक्षणविस्तार अधिकां-यांना कामासाठी उपलब्ध वेळ या सुविधाबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ४०% इतकी आहे. निश्चित सांगता येत नाही असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्या १०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

अ-२ सारणी क्रमांक २ वरून असे निदर्शनास येते की,

१] भौतिक सुविधा व प्राथमिक शाळांच्या इमारतीबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ६०% इतकी आहे. असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

२] प्राथमिक शाळामध्ये उपलब्ध असलेले साहित्य या सुविधा बद्दल २०% प्रतिसादकांना काही अंशी समाधान वाटते ४०% प्रतिसादकांना काही अंशीअसमाधान वाटते. ४०% प्रतिसादकांना काही अंशी असमाधान वाटते.

खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे. निश्चित सांगता येत नाही असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

३] प्राथमिक शाळांचा प्रयोगशाळा या सुविधाबद्दल काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ४०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांचीसंख्या ४०% इतकी आहे.

४] प्राथमिक शाळांमधील ग्रंथालये या सुविधाबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ४०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

५] प्राथमिक शाळांमधील क्रिडांगणे व खेळाचे साहित्या या सुविधाबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. निश्चीत सांगता येत नाही असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्याा १०% इतकी आहे.

मनुष्यबळ –

१] प्राथमिक शिक्षकांच्यासंख्येबद्दल ५०% प्रतिसादकांना काही अंशी समाधान वाटते. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रति सादकांची संख्या २०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे.

२] प्राथमिक शिक्षकांचा व्यावसायिक दर्जा या सुविधांबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ४०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या २०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रति सादकांची संख्या ३०% इतकी आहे. निश्चित सांगता येत नाही असे मत असणा-या प्रतिसादकांची संख्या १०% इतकी आहे.

३] शिक्षणविस्तार अधिका-यांच्या संख्येबद्दल काही अंशी समाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. काही अंशी असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ३०% इतकी आहे. खूपच असमाधान वाटणा-या प्रतिसादकांची संख्या ४०% इतकी आहे.

अ-३ शिक्षणविस्तार अधिका-यांच्या कार्याचे स्वरूप –

१] प्रस्तावनेच्या मसुद्याशी १००% प्रतिसादक सहमत आहेत. शिक्षणविस्तार अधिका-याची भूमिका ही मार्गदर्शक,प्रेरक, समन्वयक,संघटकाची तसेच कार्यकर्त्याची असावी असे १००% विस्तार अधिका-याचे मत आहे.

२] १०% प्रतिसादकांच्या मते शिक्षणविस्तार अधिका-यांची पदे मंजूर करण्याचे निकष खालीलप्रमाणे असावेत.

३० शाळांच्यावरती १ शिक्षणविस्तार अधिकारी अथवा
१५० शिक्षकांच्या संख्येमागे १ शिक्षणविस्तार अधिकारी

१०% प्रतिसादकांच्या मते
२० शाळांवरती एक शिक्षणविस्तार अधिकारी व
१०० शिक्षकांच्या संख्येवरती १ शिक्षणविस्तार अधिकारी
असे असावे.

२] कर्तव्ये –

प्रश्न अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावी असे आपणास वाटते ?

१] अध्यापनात कटाक्षाने शैक्षणिक साधनांचा वापर करणे.
२] स्कॉलरशीप परीक्षेत विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे.
३] विविध स्पर्धेची तयारी करून घेणे.

६०% शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मते वरील जादा कर्तव्ये समाविष्ठ करावीत.

३] विद्यार्थ्यांविषयीची कर्तव्ये–

अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?

१] शिष्यवृत्ती परीक्षांचा सराव घेणे.
२] शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

३] प्राथमिक शाळाविषयीची कर्तव्ये -

१००% शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मते परिशिष्ट मध्ये दिलेली १ ते ७ कर्तव्ये पुरेशी व आवश्यक आहेत.

४] कार्यालयाविषयीची कर्तव्ये :- २ ते ५ कर्तव्ये परिशिष्ट मध्ये दिलेली आहेत

प्रश्न : या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावी असे आपणास वाटते.?

शिक्षणविस्तार अधिका-यांची कार्यालयाविषयीची दिलेली कर्तव्ये परिशिष्ट 'इ' मध्ये आहेत ती पुरेशी आहेत असे १००% शिक्षणविस्तार अधिका-यांचे मत आहे.

५] जनसंपर्कविषयक कर्तव्ये -

१ ते २ कर्तव्ये प्रकरण .४ मध्ये दिलेली आहेत.

प्रश्न :

अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?

पालक भेटी घेवुन श्रमदानाचे काम करुन घेणे. हे जादा कर्तव्य समाविष्ट व्हावे असे ७०% शिक्षणविस्तार अधिका-यांना वाटते.

वरील दोन व क्रमांक ३ ही कर्तव्ये पुरेशी आहेत.

६] नियोजन व विशेष योजनांची अंमलबजावणी :-

अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावी असे आपणास वाटते ?

परिशिष्ट 'इ' मध्ये दिलेली १ ते ७ कर्तव्ये पुरेशी व आवश्यक आहेत असे८०% शिक्षणविस्तारअधिका-याचे मत आहे.

आ] या गटातील कोणती कर्तव्ये वगळावी असे आपणास वाटते ? क्रमांक द्या ?

७] <u>इतर कर्तव्ये</u>

प्रश्न – अ] या गटातील यादीत कोणती जादा कर्तव्ये समाविष्ट करावीत असे आपणास वाटते ?

परिशिष्ट 'इ' मध्ये दिलेली १ ते ८ कर्तव्ये पुरेशी व आवश्यक आहेत असे १०% शिक्षणविस्तार अधिका-याचे मत आहे.

अ-४ <u>गटविकास अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याशी संबंध</u>

१] १९७६-७७ पासून शासनाने शिक्षणविस्तार अधिका-यांवरील गटविकास अधिका-याचे नियंत्रण काढून ते जिल्हा परिषद शिक्षण अधिका-यांकडे दिले. या निर्णयामुळे कोणते फायदे झाले आहेत. असे आपणास वाटते.

शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन कार्यास गती आलेली आहे. शिक्षणविस्तार अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यासाठी तालुका पातळीवरील गटशिक्षणाधिकारी कार्यरत असतात. तयामुळे शिक्षण खात्यातील विविध प्रश्न चटकन सुटताना आपणास दिसतात.

२] वरील निर्णयामुळे कोणत्या अडचणी निर्माण झाल्या असे आपणास वाटते ? वरील निर्णयामुळे अडचणीऐवजी प्रशासन कार्यास गती आलेली आहे.

३] १९८३ पासूनविकासगट पातळीवर गटशिक्षाणाधिका-यांची पदे निर्माण झाली ही व्यवस्था परिणामकारक आहे.

१] पुरेसा शिक्षक वर्ग दिला जावा.

२] केंद्रप्रमुख नेमुन प्रशिक्षण देण्यात यावे.

३] पुरेसे शिक्षणविस्तारअधिकारी नेमावेत.

४] गटशिक्षणाधिका-यास तालुकापातळीवरील पुरेसे स्वातंत्र्य असावे.

५]

४] जिल्हयामध्ये १९९५ पासून केंद्रमुख्याध्यापकांची विविध पदे भरली गेली ही व्यवस्था अत्यंत परिणामकारक आहे. परिणामकारकता वाढविण्यातही केंद्रप्रमुखांना प्रशिक्षण द्यावे. केंद्रशाळेजवळ केंद्रप्रमुखांच्या निवासाची व्यवस्था व्हावी. प्रवासभाडयामध्ये व वेतनामध्ये भरीव वाढ करावी. इत्यादी.

## अ-५ शिक्षणविस्तार अधिकारी यांचा विविध कामावर खर्च होणारा वेळ

१] शिक्षणविस्तार अधिका-यांचा विविध कामासाठी कामाच्या एकूण वेळेच्या किती टक्के वेळ खर्च होतो याचा शक्य तेवढा अचूक अंदाज द्या १.

सारणी क्र. ३

| कामाचे स्वरूप | खर्च झालेल्या वेळेची टक्केवारी | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | | टक्केवारी |
| १. प्राथमिक शाळांना भेटी | २०% | ३० | २२ | ३२ | १८ | २८ | ३० | २० | १८ | २२ | २४० | २४ |
| २. प्राथमिक शाळांचीतपासणी | १६% | २ | १४ | ८ | १८ | ४ | १० | १६ | ४ | १४ | १०६ | १०.६ |
| ३. माध्यमिक शाळा, बालवाडया व इतर संस्थाना भेटी | २% | १० | ४ | ५ | २ | ८ | १० | २ | ८ | २ | ५३ | ५.३ |
| ४. प्रवास | ४% | १० | २ | ५ | ४ | ८ | १० | ४ | ८ | ४ | ५९ | ५.९ |
| ५. सभा, शिबिरे, संमेलने इ. | १३% | ६ | ११ | १० | ११ | १[illegible] | १० | १३ | १० | १३ | १०७ | १०.७ |
| ६. गटविकास अधिकारी व पंचायत समितीचे सभापती यांच्याशी चर्चा | ५% | ५ | ७ | ८ | ७ | ७ | १० | ५ | ९ | ५ | ६८ | ६.८ |
| ७. भेटावयास आलेल्या व्यक्तिशी चर्चा | २% | ७ | २ | ५ | २ | ५ | ५ | २ | ८ | २ | ४० | ४.० |
| ८. कार्यालयीन काम | ३०% | २० | २८ | २० | २८ | २५ | १० | ३० | २५ | ३० | २४६ | २४.६ |
| ९. इतर | ८% | १० | १० | ७ | १० | ५ | ५ | ८ | १० | ८ | ८१ | ८.१ |
| | | | | | | | | | | | | १००% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शिक्षण विस्तार अधिका-यांचा प्राथमिक शाळांच्या भेटीसाठी २४% इतका वेळ खर्च होतो. १०.८% इतका वेळ प्राथमिक शाळांच्या तपासणीसाठी होतो.

५.३% इतका वेळ माध्यमिक शाळा,बालवाडया व इतर संस्थांना भेटी देण्यासाठी होतो. ५.९% इतका वेळ प्रवासासाठी होतो. ६.८% इतका वेळ गटविकास अधिकारी व पंचायत समितीचे सभापती यांच्याशी चर्चा करण्यासाठी होतो. १०.७% इतका वेळ सभा,शिबीरे,संमेलने इ. कामासाठी होतो. ४%इतका वेळ भेटावयास आलेल्या व्यक्तिंशी चर्चा करण्यात होतो. २४.६% इतका वेळ कार्यालयीन कामामध्ये खर्च होतो. ८.१% इतका वेळइतर कामामध्ये होतो असे दिसून येतो.

२] शिक्षण विभागाशी संबंधीत नसणारी कोणती कामे आपणास करावी लागतात ? खालील जागेत तपशील द्यावा.

पल्स पोलिओ,सर्वेक्षण,आरोग्य मोहीम राबविणे. दारिद्र्य रेषेखालील लोकांचा सर्व्हे करणे, प्रौढ साक्षरता मोहीम राबविणे, जनगणना, पशुगणना, कामावरती देखरेख ठेवणे, भागा मध्ये कुटुंबनियोजन वृक्षारोपन कार्यक्रमासाठी सहकार्य करणे. इत्यादि अशैक्षणिक कामे शिक्षणविस्तार अधिका-यांना करावी करावी लागतात. ६०% शिक्षणविस्तार अधीका-यांच्या वरील सर्व अशेक्षणीक कामे शिक्षण अधिका-यांच्याकडे मते देवु नयेत त्यासाठी वेगळी प्रशासकीय रचना असावी असे मत आहे.

वरील सर्व अशैक्षणिक कामाच्या व्यापामुळे शिक्षण अधिकारी शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासनाकडे पुरेसे लक्ष देवु शकत नाहीत.

सारणी क्र. ४ कार्यप्रेरणेवर परिणाम करणारे घटक

| कार्यप्रेरणेवर परिणाम करणारे घटक | आवश्यक ती कार्यप्रेरणा मिळण्यासाठी बाजूला दिलेली गजर आपल्या स्वत:च्या पदाचा विचार केल्यास आपल्या मते — १] किती प्रमाणात पूर्ण झाली आहे | | | | | २] किती प्रमाणात पूर्ण होणे आवश्यक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खूपच | ब-याच प्रमाणात | काही प्रमाणात | अल्प प्रमाणात | मुळीच नाही | खूपच | ब-याच प्रमाणात | काही प्रमाणात | अल्प प्रमाणात | मळ नी |
| १] वेतनश्रेणी व इतर आर्थिक लाभ | | १०% | ७०% | २०% | - | २०% | ७०% | १०% | | |
| २] स्वत:च्या व्यावसायिक विकासाला वाव | | | १०% | ८०% | १०% | ८०# | १०% | १०% | | |
| ३] पदोन्नतीची संधी | | | | ९० | १०% | ३० | ६०% | १०% | | |
| ४] महत्वपूर्ण कार्य केल्याचे समाधान | | ७०% | १०% | १०% | १०% | २०% | १०% | ७०% | | |
| ५] चांगल्या कामाबद्दल गुणग्रहण | २०% | १०% | १०% | ६०% | १०% | ६ | ६०% | १०% | १०% | २८ |
| ६] शिक्षण विभागाचे विभागाबाहेर महत्व | | २०% | ६०% | २०% | | २०% | ६०% | २०% | | |
| ७] सेवा शाश्वती | १०% | ६०% | १०% | २०% | | २०% | २०% | ५०% | १०% | |
| ८] कामातील विविधता व आव्हान | | १०% | १०% | ७०% | १०% | ७०% | १०% | १०% | | |

शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मतानुसार गरजांना दिलेले महत्वक्रमांक

खालील सारणीत सारणी क्र. ५ मध्ये दिलेले आहेत.

| गरज क्रमांक | कार्यप्रेरणेवर परिणाम करणारे घटक | प्रतिसादकांनी महत्वानुसार दिलेले क्रमांक | | | | | | | | | | एकूण | सरासरी | महत्वक्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | | | |
| १. | वेतनश्रेणी व इतर आर्थिक लाभ | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | २ | १ | १ | २० | २ | १ |
| २. | स्वत:च्या विकासाला वाव | ५ | ५ | ६ | ३ | ५ | ८ | ४ | ७ | ४ | ४ | ५१ | ५.१ | ६ |
| ३. | पदोन्नतीची संधी | २ | २ | ५ | १ | २ | १ | ७ | १ | २ | २ | २५ | २.५ | २ |
| ४. | महत्वपूर्ण काम केल्याचे समाधान | ८ | ६ | ७ | ४ | ६ | ३ | १ | ३ | | ६ | ४८ | ४.८ | ५ |
| ५. | चांगल्या कामाबद्दल गुणग्रहण | ४ | ४ | २ | ५ | ३ | ४ | २ | ४ | ५ | ५ | ३८ | ३.८ | ३ |
| ६. | शिक्षणविभागाचे विभागाबाहेर महत्व | ७ | ७ | ८ | ८ | ७ | ६ | ६ | ६ | ८ | ८ | ७१ | ७.१ | ८ |
| ७. | सेवाशाश्वती | ३ | ३ | ४ | ६ | ४ | ५ | ५ | ५ | ३ | ३ | ४१ | ४.१ | ४ |
| ८. | कामातील विविधता व आव्हान | ८ | ८ | ३ | ७ | ८ | ७ | ३ | ८ | ७ | ७ | ६६ | ६.६ | ७ |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकंदरीत शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मते गरजक्रमांक १ ला महत्व क्रमांक १, गरज क्रमांक ३ ला महत्व क्रमांक २, गरजक्रमांक ५ ला महत्व क्रमांक ३, गरज क्रमांक ७ ला महत्वक्रमांक ४, गरजक्रमांक ४ ला महत्वक्रमांक ५, गरज क्रमांक २ ला महत्वक्रमांक ६ गरज क्रमांक ८ ला महत्व क्रमांक ७ व गरज क्रमांक ६ ला महत्व क्रमांक ८ दिलेला आहे.

## प्रकरण सहा

## निष्कर्ष व शिफारशी

| अ.नं. | सारणी क्रमांक | शिर्षक |
|---|---|---|
| १ | ६.१ | प्रस्तावना |
| | ६.२ | जिल्हा परिषद शिक्षण समितीत मुख्याध्यापकांना प्रतिनिधीत्व असणेबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३ | शिक्षणाधिकाऱ्यांच्या भेटीबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.४ | शाळांना केलेल्या अर्थ पुरवठ्याबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.५ | जिल्हा परिषदेने पुरविलेल्या बाबींची संख्या व गुणवत्ता याबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.६ | शालेय इमारतीबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.७ | शाळेतील आवश्यक विविध बाबी याबद्दल निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.८ | शिक्षक संख्येबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.९ | शिक्षक बदली धोरणाबाबत निष्कर्ष व शिफारशी. |
| | ६.१० | सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत निष्कर्ष व शिफारशी. |
| | ६.११ | सावित्रीबाई दत्तक पालक योजनेच्या अंमलबजावणीबाबत निष्कर्ष व शिफारशी |

| अ.नं. | सारणी क्रमांक | शिर्षक |
|---|---|---|
| | ६.१२ | शिक्षक बदली धोरणाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१३ | शिक्षणाधिका-यांकडून होणा-या शाळांच्या पर्यवेक्षणाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१४ | शाळा तपासणीबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१५ | शाळा पर्यवेक्षणातील अडचणीबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१६ | कार्यालयीन कामास खर्च होणा-या वेळेबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१७ | सक्तीच्या शिक्षण योजनेच्या कार्यवाही बाबत निष्कर्ष व शिफारशी |
| २ | ६.१८ | तालुका मास्तरचे स्वतंत्र पद याबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.१९ | तालुका मास्तरांच्या आर्थिक व्यवहारातील अडचणीबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.२० | शैक्षणिक साहित्य व आदेश भागातील शाळांना पाठविणेबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.२१ | कार्यालयीन कामावर खर्च होणा-या वेळेबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.२२ | तालुका मास्तरांच्या कामाच्या मोबदल्या बाबत निष्कर्ष व शिफारशी. |
| | ६.२३ | शिक्षक व समाजाच्या सहकार्याबाबत निष्कर्ष व शिफारशी |

| अ.नं. | सारणी क्रमांक | शीर्षक |
|---|---|---|
| ३ | ६.२४ | अधिका-यांच्या दप्तराबाबत निष्कर्ष व शिफारशी. |
| | ६.२५ | शिक्षक बदली धोरणाबाबत |
| | ६.२६ | जि.प.शिक्षण समितीतील प्रतिनिधीत्व मिळणेबाबत. व कार्यालयीन कामावर खर्च होणा-या वेळेबाबत. |
| | ६.२७ | पंचायत समितीने घेतलेल्या चांगल्या निर्णया बाबत. |
| | ६.२८ | वरिष्ठांच्या भेटीबाबत |
| | ६.२९ | तालुका मास्तरचे कार्य, शै.गुणवत्ता वाटीसाठी सहकार्य, अधिकारी दप्तर, |
| | ६.३० | कामातील हस्तक्षेप व कामातील कसूरीबाबत. |
| | ६.३१ | केंद्रप्रमुखांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३२ | केंद्रप्रमुखाच्या वयाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३३ | केंद्रप्रमुखांच्या अनुभवाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३४ | केंद्र प्रमुखानी दिलेल्या शैक्षणिक उद्दिष्टे महत्वाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३५ | केंद्रप्रमुखांच्या कामाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३६ | केंद्रप्रमुखांची वरिष्ठ अधिका-यांशी असलेल्या संबंधाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३७ | केंद्रप्रमुखांच्या अधिकाराबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.३८ | दहा शाळांवरती एक केंद्रप्रमुख या व्यवस्थेबाबत निष्कर्ष व शिफारशी |

| अ.नं. | सारणी क्रमांक | शीर्षक |
| --- | --- | --- |
| | ६.३९ | केंद्रप्रमुखाच्या विविध कामावर खर्च होणारा वेळ याबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.४० | केंद्रप्रमुखाच्या कार्यप्रेरणेवर परिणाम करणा-या घटकांबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| ४ | ६.४१ | शिक्षण विस्तार अधिका-यांनी विविध शैक्षणिक उद्दिष्टांना दिलेल्या महत्वा बाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.४२ | शिक्षण विस्तार अधिका-यांना दिलेल्या उपलब्ध सुविधाबाबत निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.४३ | शिक्षण विस्तार अधिका-यांचा विविध कामावर खर्च होणा-या वेळेसंबंधी निष्कर्ष व शिफारशी |
| | ६.४४ | शिक्षण विस्तार अधिका-यांच्या कार्य प्रेरणेवर परिणाम करणा-या घटकाबाबत निष्कर्ष व शिफारशी. |
| | ६.४५ | शिक्षणविस्तार अधिका-यांच्या गरजाबाबत निष्कर्ष व शिफारशी. |

शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन प्रशासकाचे अधिकार, कर्तव्ये जिल्हा पातळीवरील व तालुका पातळीवरील प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास प्रकरण क्रमांक ४ मध्ये केलेला आहे.